cmyk


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१४३ | गुरूवार, दि.१८ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## संपादकीय

### पुन्हा प्रतीक्षा : स्थानिक प्रश्नांना वाचा कोण फोडणार?

गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. कधी ओबीसी आरक्षण, कधी प्रभागांची रचना, कधी वार्डाची फेररचना अशा अनेक अडचणी यात वेळोवेळी उद्भवत गेल्या आणि निवडणुका लांबणीवर पडत गेल्या. या निवडणुकांमध्ये केवळ महापालिकांच्या निवडणुकाच नव्हे तर जिल्हा परिषदा, नगरपालिका अशा सर्वच स्तरावरील निवडणुकांचा समावेश आहे. मुळात राज्य सरकारलाही या निवडणुका तत्परतेने घेण्यात फार स्वारस्य दिसले नव्हते.

### मोदींच्या आईचा एआय व्हिडिओ तात्काळ हटवण्याचे हायकोर्टाचे आदेश

पाटणाः पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या दिवंगत आई हीराबेन मोदी यांचा एआय-जनरेटेड व्हिडिओ सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून तात्काळ हटवण्याचे निर्देश पाटणा उच्च न्यायालयाने बुधवारी (दि. १७) काँग्रेसला दिले. दि.१० सप्टेंबर रोजी बिहार काँग्रेसच्या एक्स हँडलवर एक पोस्ट शेअर करण्यात आली होती, ज्यामध्ये च्या माध्यमातून पंतप्रधान मोदी यांच्या स्वप्नात त्यांच्या आई आल्याचे दाखवले होते. या व्हिडिओमध्ये हीराबेन त्यांच्या मुलाला म्हणजे नरेंद्र मोदींना राजकीय फायद्यासाठी आपल्या नावाचा गैरवापर केल्याबद्दल फटकारताना दिसत आहे. एका दृश्यात, पंतप्रधान मोदींसारखा दिसणारा व्यक्ती अंथरुणावर झोपताना म्हणतो, आजची मते चोरीला गेली, आता शांत झोप घे. मग त्यांच्या स्वप्नात त्यांची आई येते आणि त्यांना फटकारते.

# रब्बीसाठी १२ लाख मॅट्रिक टन युरिया द्या

## कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांचे केंद्रीय मंत्री जेपी नड्डा यांना पत्र

पुणे । प्रतिनिधी

**महाराष्ट्रात २०२५ रब्बी हंगामासाठी युरियाचा तुटवडा भासू नये व शेतकऱ्यांना विहित वेळेत पीक उत्पादनासाठी युरिया मिळावा या पार्श्वभूमीवर कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केंद्र सरकारच्या रसायन आणि खत मंत्री जे पी नड्डा यांना पत्र लिहीत राज्याला तातडीने युरियाचा पुरवठा करण्याची मागणी केली आहे. सध्या राज्यातील युरियाचा साठा केवळ २.३६ लाख मॅट्रिक टन इतकाच राहिला असल्याने तातडीने युरिया पुरवठा होण्याची गरज त्यांनी या पत्रात व्यक्त केली आहे.**



दत्तात्रय भरणे पुढे आपल्या पत्रात म्हणाले की, राज्याला एप्रिल ते जुलै या कालावधीत केंद्राकडून १०.६७ लाख मेट्रिक टन युरियाचे वाटप होणे अपेक्षित होते, मात्र, एकूण युरिया खतापैकी फक्त ७९% म्हणजे ८.४१ लाख मेट्रिक टन युरियाचा पुरवठा करण्यात आला. त्यातच ऑगस्ट महिन्यात २.७९ लाख मेट्रिक टन वाटपातील केवळ ०.९६ लाख मेट्रिक टन पुरवठा मिळाला असल्याचे सांगितले. पुढे पत्रात दत्तात्रय भरणे म्हणाले की, राज्यात खरीप हंगामातील पेरणी ९८ टक्के पूर्ण झाली असून, एकूण पेरणी क्षेत्र १४४ लाख हेक्टर आहे. विशेष म्हणजे, यंदा १४.३० लाख हेक्टरवर मक्याची पेरणी झाली असून, मका पेरणी तब्बल ५४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे कापूस, मका आणि इतर पिकांसाठी टॉप ड्रेसिंग डोसची मागणी वाढली असल्याचे सांगितले. शेवटी आपल्या पत्रात दत्तात्रय भरणे म्हणाले, शेतकऱ्यांच्या अडचणी ▶▶ पान २ वर

## पंचनाम्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांच्या धमकीनंतर शेतकऱ्याची आत्महत्या

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

**जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील खादगाव येथील संजय शेषराव कोहकडे यांनी आत्महत्या केल्याची दुःखद घटना घटली आहे. शेतात पाणी शिरून नुकसान झाल्याने कोहकडे यांनी तक्रार दिली होती. नुकसानीचा पंचनामा सुरु असतानाच महसूलच्या अधिकाऱ्यांनी अपमान केल्याने आणि कारवाईची धमकी दिल्याने शेतकरी संजय कोहकड यांनी विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली.**

खादगावखेर्डा रस्त्याच्या कामादरम्यान ठेकेदाराने दोन्ही बाजूंनी नाले खोदल्याने पावसाचे पाणी थेट कोहकडे यांच्या शेतात शिरून पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत होते. तसेच शेतात जाण्यासाठी असलेला रस्ता बंद झाल्यामुळे त्यांनी महसूल मंडलाधिकारी शिंदे आणि तलाठी गोजरे यांच्याकडे कारवाई करण्याची तक्रार केली होती. या तक्रारीनंतर मंडलाधिकारी, तलाठी नुकसानीच्या पंचनाम्यासाठी कोहकडे यांच्या शेतात आले. यावेळी काही ग्रामस्थ आणि कोहकडे यावेळी उपस्थित होते. यावेळी अधिकारी आणि शेतकऱ्यांमध्ये कुजबूज झाल्यानंतर अधिकाऱ्यांनी कोहकडे यांनाच उलट दोषी ठरवत, विनाकारण अडथळा केल्यास गुन्हा दाखल करू अशी धमकी दिली. या प्रकारानंतर, नाराज आणि अपमानित झालेल्या कोहकडे यांनी सर्वांसमोरच विहिरीत उडी मारली. पण त्यांना पोहता येत नसल्याने जागीच त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर, शेतकरी संजय कोहकडे यांचा मृतदेह ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### मुलाने जन्मदात्या बापालाच संपविले

चाकूरः परंतु पोलिस भरतीच्या फीससाठी मला पैसे ठेवले नाहीत, म्हणून स्वतःच्या पोटच्या मुलांने जन्मदात्या बापाच्या डोक्यात काठी घालून त्याचा निघृण खून केल्याची घटना चाकूर तालुक्यातील हिंपळनेर येथे मंगळवारी पहाटे ३ च्या सुमारास घडली. पोलिसांनी त्या मुलाला अटक केले असून या घटनेने लातूर जिल्हा व परिसरात एकच खळबळ उडाली आहे. हिंपळनेर येथील अजय देविदास पांचाळ वय २४ वर्षे याने त्याचे वडील देविदास काशीनाथ पांचाळ वय ७० वर्षे यांना मला पोलिस भरतीच्या फीस भरण्याकरिता पैसे न देता तुम्ही गॅस भरून का घेतला? याचा राग मनात वडिलांस हातातील लाकडाने मारून जखमी करून ठार मारले. अशी तक्रार मुलाची आई शारदाबाई देविदास पांचाळ वय ५० वर्षे हिने पोलिसांत दिल्यावरून पोलिसांनी अजय देवीदास पांचाळ वय २४ वर्षे याच्याविरुध्द चाकूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक जी. एन. चामले हे करीत आहेत.

### दोन महिला नक्षलींचा खात्मा

गडचिरोली : एटापल्ली तालुक्यातील गट्टा जांबिया पोलिस ठाणे हद्दीतील मोडस्के जंगल परिसरात झालेल्या चकमकीत दोन महिला नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात पोलिसांना १७ सप्टेंबर रोजी यश आले आहे. घटनास्थळावरून एके ४७ रायफल, अत्याधुनिक पिस्तूल, जिवंत दारुगोळा व नक्षली साहित्य मोठ्या प्रमाणावर जप्त करण्यात आले आहे. या चकमकीमुळे नक्षली संघटनांना मोठा धक्का बसला आहे. मोडस्के जंगल परिसरात काही नक्षली दडून बसल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार, अहेरी येथून अपर अधीक्षक सत्यसाई कार्तिक यांच्या नेतृत्वात सी-६० जवान १७ रोजी सकाळी सात वाजता रवाना केले होते, केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या १९१ बटालियनची कंपनी व गट्टा जांबिया ठाण्यातील पथकाच्या मदतीने सी- ६० जवानांनी संपूर्ण जंगलाला वेढा टाकून नक्षलविरोधी अभियान सुरु केले.

### जीएसटी सुधारणांमुळे अर्थव्यवस्थेत २ लाख कोटी

दिल्ली : मोदी सरकारच्या जीएसटी दर कपातीच्या निर्णयामुळे अर्थव्यवस्थेत २ लाख कोटी रुपये येतील. यामुळे सर्वसामान्यांच्या हातात अधिक पैसे राहतील, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटले आहे. या नव्या जीएसटी कर प्रणालीत ५ टक्के आणि १८ टक्के असे दोनच स्लॅब ठेवले आहेत. त्यामुळे अर्थव्यवस्थेत २ लाख कोटी रुपयांचा ओघ येईल. तसेच लोकांच्या हातात अधिक पैसे राहतील,'' असे सीतारामन यांनी सांगितले. याबाबतचे वृत्त पीटीआयने दिले आहे. नवीन जीएसटी दर २२ सप्टेंबरपासून लागू होतील. नेक्स्ट जनरेशन जीएसटी सुधारणांबाबत आयोजित संवाद कार्यक्रमात, सीतारामन यांनी अधोरेखित केले की, याआधी १२ टक्के जीएसटी लागू असलेल्या ९९ टक्के वस्तू आता ५ टक्क्यांच्या श्रेणीत आल्या आहेत. याव्यतिरिक्त, २८ टक्के जीएसटी असलेल्या ९० टक्के वस्तू १८ टक्क्यांच्या श्रेणीत आल्या आहेत. २२ सप्टेंबर रोजी नवीन जीएसटी सुधारणा लागू होण्याआधीच, प्रमुख ग्राहकोपयोगी वस्तूंचे उत्पादन घेणाऱ्या कंपन्या स्वत:हून दर कमी करत आहेत. याचा सामान्य ग्राहकांना फायदा होत आहे, असे त्यांनी नमूद केले आहे.

# बीडच्या जनतेच्या स्वप्नपूर्तीचा ऐतिहासिक दिवस

## बीड ते अहिल्यानगर रेल्वे शुभारंभ प्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांचे प्रतिपादन

बीड । प्रतिनिधी

**अनेक दशकांपासून बीडच्या जनतेने प्रतीक्षा केलेली रेल्वे बीड येथून सुरू झाली असून, बीडकरांना ऐतिहासिक भेट देत रेल्वेचे स्वप्न पूर्ण झाल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी दिवंगत गोपीनाथराव मुंडे, केशरकाकू क्षीरसागर यांचा मोठा वाटा असल्याचेही त्यांनी सांगितले.**

अंमळनेर (भां) ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून केला. यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे, खासदार रजनी पाटील, खासदार बजरंग सोनवणे, आमदार सर्वश्री विक्रम काळे, धनंजय मुंडे, विजयसिंह पंडित, आमदार श्रीमती नमिता मुंदडा, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिपचे मुख्य ▶▶ पान २ वर



### बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय–उपमुख्यमंत्री

पालकमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले की, ३० ते ३५ वर्षानी रेल्वेचे हे काम झाले आहे. या कामासाठी विलंब झाला आहे. यासाठी आत्मचिंतन करण्याची गरज आहे. पुर्वीचा काळ व आजचा काळ यामध्ये मोठा फरक आहे. आज कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर होत आहे. ही रेल्वे पुणे आणि पुढे मुंबई पर्यंत घेवून जाण्यासाठी आपण प्रयत्नशिल आहोत. जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघातील कोणतीही विकास कामे अडणार नाही याकडे लक्ष देण्यात येईल. रेल्वेचे स्वप्न पूर्ण झाले असून आता विमानतळाकडे आपले लक्ष आहे. जिल्ह्यात उद्योगपती आल्यास उद्योग स्थापन करुन रोजगार उपलब्ध होतील. बीडमधील गोरगरिबांना उपचारासाठी मुंबई-पुण्याला जाण्याची आवश्यकता पडणार नाही. यासाठी येथेच आरोग्याच्या चांगल्या सुविधा निर्माण करणार असल्याचे त्यांनी सांगितले. बीड जिल्ह्याच्या विकास कामासाठी निधी कमी पडू देणार नाही, असे ते म्हणाले. बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले.

### राष्ट्रीय महामार्गासाठी सुमारे १० हजार कोटी रुपये निधी – पंकजा मुंडे

मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, बीड येथे रेल्वेसाठी सर्व लोकप्रतिनीधीनी पुढाकार घेतला. रेल्वे ही नागरिकांच्या उन्नतीसाठी असणे आवश्यक आहे. विलासराव देशमुख आणि गोपीनाथराव मुंडे यांनी मराठवाड्यात रेल्वे आली पाहिजे यासाठी पुढाकार घेतला. बीड जिल्हा कष्टकऱ्यांचा आणि स्वाभिमानी लोकांचा आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जिल्ह्यातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गासाठी सुमारे १० हजार कोटी रुपये निधी दिला. बीडला रेल्वे यावी यासाठी अनेकांनी आपले योगदान दिले. जिल्ह्याच्या विकासासाठी आपलेही योगदान देण्याची तयारी आहे. जिल्ह्यावर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी कृपादृष्टी ठेवावी अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

### बीडकरांकडून सेल्फी काढून आनंद व्यक्त

मराठवाड्यातील बीड हे रेल्वेमार्गापासून वंचित होते. त्यामुळे, गेल्या तीन पिढ्यांपासून बीडमध्ये रेल्वेचे इंजिन धावावे, रेल्वेची शिट्टी वाजावी, रेल्वेने बीडमध्ये उतरावे हे स्वप्न बीडकरांनी पाहिले होते. अखेर, हे स्वप्न दि.१७ रोजी सत्यात उतरले. बीडकरांच्या स्वप्नांची पूर्तता झाल्याचा आनंद बीड रेल्वे स्थानकावर पाहायला मिळाला. जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातून आलेल्या बीडकरांनी रेल्वे पाहण्यासाठी गर्दी केली होती. रेल्वे स्थानकावर फोटो, व्हिडिओ काढण्यासाठी, सेल्फी घेण्यासाठी नागरिकांची मोठी रीघ पाहायला मिळाली.

### पहिल्याच दिवशी एक हजार तिकिटांची विक्री!

दिनांक १७ सप्टेंबर रोजी बीड- आहिल्या नगर या प्रवासी रेल्वेला प्रारंभ झाला. बीड करांनी यावेळी मोठी गर्दी केल्याचे दिसून आले. रेल्वेच्या मध्ये विभागाने या मार्गावर धावणाऱ्या रेल्वेचे वेळापत्रकही जाहीर केले आहे. आता नियमितपणे बीड ते अहिल्यानगर असा रेल्वे प्रवास होणार आहे. पहिल्या दिवशी बीडकरांचा मोठा प्रतिसाद दिसून आला. तब्बल १००० तिकीटांची विक्री एका दिवसात झाल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले. बीड ते अहिल्यानगर एवढाच मार्ग सध्या सुरू झाला असून येत्या काही दिवसांमध्ये ही रेल्वे परळी पर्यंत धावणार आहे. त्यामुळे प्रवाशांचा मार्गावरील रेल्वेला मोठा प्रतिसाद मिळणार असल्याचे दिसून येत आहे.

## मराठ्यांची आता दिल्ली वारी

### देशभरातील मराठ्यांना मनोज जरांगे एकत्र करणार

धाराशीव । प्रतिनिधी



**मराठा आरक्षण लढ्याचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आता मराठा एकत्रिकरणाचा लढा हाती घेतल्याचे दिसून येत आहे. देशभरातील मराठा समाज एक व्हावा, विचारांची देवाण-घेवाण व्हावी यासाठी दिल्लीमध्ये मराठा अधिवेशन होणार आहे. बुधवारी जरांगे पाटील हे मराठवाड्यातल्या धाराशिव येथे होते. त्यावेळी त्यांनी समाजबांधवांशी संवाद साधला.**

धाराशिवमध्ये बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आम्ही दिल्लीला जात आहोत, ते कुठल्याही मागण्यांसाठी नाही. आम्ही राज्या-राज्यात विखुरलेले आहोत. कधीकाळी आमच्या छत्रपती शिवरायांनी आपल्यासाठी स्वराज्य निर्माण केले होते. स्वराज्यातले देशभरातील बांधव ▶▶ पान २ वर

## बीडला प्रगत जिल्ह्याच्या अग्रस्थानी आणणार-अजीत पवार

### मराठवाडा मुक्ती संग्राम दिन ध्वजारोहण कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील प्रत्येक कुटूंबाचे स्वतःचे घर असले पाहिजे हे आपले ध्येय आहे. जिल्ह्यात विविध उपक्रम आणि प्रकल्पाच्या माध्यमातून बीडच्या विकास यात्रेची नवी सुरुवात झाली आहे. आपण सर्वजण मिळून जिल्ह्यात तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेती-उद्योग-शिक्षण-आरोग्य-पर्यावरणासह सर्वच क्षेत्रात बीड जिल्ह्याला प्रगत जिल्ह्याच्या अग्रस्थानी आणणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजीत पवार यांनी दिली.



बुधवार दि. १७ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त पोलीस मुख्यालयाच्या पोलीस कवायत मैदानावर राष्ट्रध्वजारोहण केल्यानंतर उपस्थितांना संबोधित करताना पालकमंत्री पवार बोलत होते. पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर पालकमंत्री पवार यांनी ध्वजारोहण करुन, राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. तसेच यावेळी पथ संचलनाचे निरीक्षण केले. प्रारंभी पालकमंत्री श्री. पवार यांनी प्रियदर्शनी उद्यानातील हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र वाहून ▶▶ पान २ वर

## मतपत्रिकेवर दिसणार उमेदवारांचा फोटो

### केंद्रीय निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय

दिल्ली । वृत्तसंस्था

केंद्रीय निवडणूक आयोगाकडून बुधवारी इव्हीएम बाबत एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाकडून इव्हीम वरील मतपत्रिकेत महत्वाची सुधारणा करण्यात येणार आहे. आता इव्हीम मत पत्रिकेवर उमेदवारांचा रंगीत फोटो असणार आहे. उमेदवाराचा फोटो असलेल्या जागेत ७५ टक्के एवढा ठळक फोटो छापला जाणार आहे. हा बदल बिहार विधानसभा निवडणुकीपासून लागू होणार आहे.

निवडणूक आयोगानं अनेक राजकीय पक्षांनी तक्रारी केल्यानंतर हा महत्वाचा बदल केला आहे. याचा उद्देश हा प्रक्रिया ▶▶ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१५ सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २०.०० क्विंटल | २,४०० | २,९०० | २,६६० |
| ज्वारी/हायब्रिड : ८८.०० क्विंटल | १,७०० | ३,१४५ | २,४७८ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : १७.५० क्विंटल | ६,००० | ६,१६० | ६,०८६ |
| उडीद : ७१.०० क्विंटल | ४,१५१ | ६,१५१ | ५,०३१ |
| बाजरी: ७६.०० क्विंटल | १,८०० | २,८०० | २,४८८ |
| मुग:३४.०० क्विंटल | ३,७०० | ७,२७१ | ५,७२९ |
| सोयाबीन:९.५० क्विंटल | ३,५०० | ४,२५० | ३,८७५ |
| हरभरा:३.५० क्विंटल | ४,९०० | ६,२१० | ५,४६७ |

# पितृपक्षात गोपीनाथ मुंडे यांचा आदर!

## सिएमकडून डीएम-पीएमला राजकीय पाठबळ

सुभाष चौर । बीड

**गेल्या ४० वर्षापासून बीडकर ज्या प्रतीक्षेत होते ती प्रतीक्षा आज पूर्ण झाली. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींच्या उपस्थित बीड रेल्वेचा शुभारंभ झाला ही आनंदाची बाब आहे. मात्र मुख्यमंत्री यांनी आपल्या भाषणामध्ये बोलताना पितृ पक्षाची आठवण करत या महिन्यात पितृपक्षांमध्ये गोपीनाथ मुंडेंना रेल्वेच्या माध्यमातून आदरांजली अर्पण करताना, एक प्रकारे त्यांची**



**कन्या पंकजा मुंडे आणि पुतणे धनंजय मुंडे यांना राजकीय पाठबळ दिल्याचे दिसून आले.**

अहिल्यानगर -बीड -परळी हा रेल्वे मार्ग बीड जिल्हा वासियांचा आत्मीयतेचा प्रश्न होता. यासाठी ४० वर्ष अनेकांनी आंदोलने आणि संघर्ष केला. त्याचे फलित म्हणून बीड ते अहिल्यानगर या रेल्वेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या उपस्थितीमध्ये झाला. या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांच्या बाजूला मंत्री पंकजा मुंडे तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बाजूला माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे बसले होते. या रेल्वे उद्घाटन कार्यक्रमाला अनेकांची भाषणे झाली, परंतु लक्षवेधी भाषण मुख्यमंत्र्यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी आपल्या भाषणामध्ये पितृ पक्षाचा उल्लेख केला. पितृपक्ष हा वडीलांसमान असलेल्या व्यक्तींचा आदर ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# पुन्हा प्रतीक्षा : स्थानिक प्रश्नांना वाचा कोण फोडणार ?

गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. कधी ओबीसी आरक्षण, कधी प्रभागांची रचना, कधी वार्डाची फेररचना अशा अनेक अडचणी यात वेळोवेळी उद्भवत गेल्या आणि निवडणुका लांबणीवर पडत गेल्या. या निवडणुकांमध्ये केवळ महापालिकांच्या निवडणुकाच नव्हे तर जिल्हा परिषदा, नगरपालिका अशा सर्वच स्तरावरील निवडणुकांचा समावेश आहे. मुळात राज्य सरकारलाही या निवडणुका तत्परतेने घेण्यात फार स्वारस्य दिसले नव्हते. आधीच्या आदेशानुसार आता दिवाळीनंतर या निवडणुका होतील हे स्पष्ट झाल्यामुळे राजकीय पक्षांच्या नेत्यांनी त्यानुसार मोर्चेबांधणी सुरू केली होती. पुण्यासारख्या ठिकाणी यासाठी लगबग सुरू झालेली पाहायला मिळाली होती.

प्रभागाच्या रचनेचे काम जवळपास अंतिम टप्प्यात आले आहे, हरकती सूचनांचा विचार झाला आहे आणि आता फक्त निवडणूक तारखाच जाहीर होण्याचा अवकाश आहे असे सगळे वातावरण असताना सुप्रीम कोर्टाचा निकाल आला आहे. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणखी चार-पाच महिने पुढे ढकलल्या गेल्या आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या शिफारसी वरूनच या निवडणुका लांबणीवर पडल्या, कारण या निवडणुकांसाठी आमच्याकडे कर्मचाऱ्यांची कमतरता आहे, ईव्हीएमची कमतरता आहे आणि सध्या सणासुदीचे दिवस आहेत अशी कारणे सांगून सुप्रीम कोर्टात मुदतवाढीची मागणी केली गेली. कोर्टाने ती मान्य केली आणि या निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्या. स्थानिक स्वराज्य संस्था आणि त्यांचा कारभार हा स्थानिक पातळीवरील विकासासाठी महत्त्वाचा असतो. अनेक बारीक-सारीक समस्या स्थानिक पातळीवरच सुटत असतात, पण तेथील निवडणुकाच तीन-चार वर्षे रखडणार असतील तर स्थानिक प्रश्नांना वाचा कोण फोडणार हा प्रश्न आजही प्रलंबित राहिला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकप्रतिनिधी नसले तरी प्रशासकांमार्फत कारभार सुरू आहे असे जरी सांगितले जात असले तरी, या प्रशासकांना नागरिकांच्या स्थानिक समस्या तितक्या प्रकर्षाने जाणवण्यात मर्यादा आहेत. तसेच प्रशासक हातचे राखून विकासकामाच्या संबंधात चालढकल करताना दिसत आहेत. त्यामुळे ही निवडणूक प्रक्रिया वेगाने पूर्ण व्हावी अशी अपेक्षा आहे. अर्थात तेथे निवडून आलेले लोकप्रतिनिधी फार कार्यक्षम असतात अशातला भाग नाही, पण निदान आपापल्या भागातील समस्यांचा आवाज तरी ते समर्थपणे प्रशासनापर्यंत पोहोचवू शकतात. महाराष्ट्रात स्थानिक निवडणुकांमध्ये इतका मोठा गॅप राहण्याचा अलीकडच्या काळातला हा बहुदा पहिलाच प्रकार असावा. योग्य वेळी या निवडणुका पार पडाव्यात यासाठी राज्य सरकार तत्पर असायला हवे होते, पण ते तितके तत्पर राहिले नाही. अर्थात यामागे राजकीय कारणेही बरीच आहेत. महाराष्ट्रात तीन पक्षांची जी सत्ताधारी आघाडी आहे, त्या आघाडीतच या निवडणुकांच्या माध्यमातून मोठे वितुष्ट निर्माण होण्याची शक्यता आहे.

राज्यातल्या सर्व महत्त्वाच्या शहरांमधील महापालिका आणि जिल्हा परिषदा आपल्या ताब्यात राहाव्यात यासाठी सत्ताधारी आघाडीतील तीनही पक्षांमध्ये जोरदार चुरस सुरू आहे. त्यामुळे त्यांच्या आपापसातील लढाईलाच या निमित्ताने तोंड फुटणार होते. ही आपापसातील लढाई सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे निदान काही महिने तरी पुढे ढकलली गेली आहे. अन्यथा विद्यमान सत्ताधार्यांपुढे या एका वेगळ्याच कटकटीला सामोरे जाण्याचे आव्हान निर्माण झाले असते. या निवडणुकांच्या मागच्या अडचणी, समस्या आणि कारणे काहीही असली तरी या निवडणुका तातडीने होणे हे स्थानिक नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. सूक्ष्म पातळीवरून स्थानिक विकासाला चालना देण्यासाठी लोकप्रतिनिधींच्या अस्तित्वासह स्थानिक स्वराज्य संस्था कार्यरत असणे कधीही फायद्याचे ठरते. सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुका लांबणीवर टाकण्याचा जो निर्णय घेतला तो घेताना आता यापुढे मुदतवाढ दिली जाणार नाही अशी जी ठाम भूमिका घेतली आहे त्याचे स्वागत करावे लागेल. त्यामुळे निदान चार महिन्यांच्या विलंबाने का होईना या निवडणुकांचे भिजत घोंगडे मार्गी लागणार आहे यातच आता निवडणूक इच्छुकाना आनंद मानावा लागेल.

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त तांदुळवाडी शाळेत प्रिंटर व पंखे अर्पण सोहळा

**कळंब । पतिनिधी**

**तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच ॲड. प्रणित शामराव डिकले यांच्या हस्ते तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक संतोष भोजने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मुख्य कार्यक्रमात लोकसहभागातून व ग्रामपंचायत सहकार्याने शाळेला नवीन प्रिंटर व पंखे भेट देण्यात आले.**

शाळेच्या भौतिक सुविधांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी गावकऱ्यांचा सहभाग राहील, असे आश्वासन सरपंचांनी दिले. शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी तन-मन-धनाने प्रयत्न करू, असे मुख्याध्यापकांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामातील वीरांवर भाषणे केली. कु. स्वप्नाली डिकले, अंकिता अंबुरे, आरती वीर, पंकजा सावंत, संघरत्न राऊत, राजवीर काळे, आरवी काळे, आदित्य नाईकनवरे, प्रज्वल बाकले, शिवम डिकले, वेदांत सावंत, आकांक्षा काळे यांनी मनोगते व्यक्त केली. ऋजुता मोरे हिने मराठवाडा गीत सादर केले. तिच्या उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल शालेय समिती सदस्य जुबेर पठाण यांनी तिला ५१ रुपये बक्षीस दिले.कार्यक्रमाचे अध्यक्षपद शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष माधव पाटील यांनी भूषविले, तर प्रमुख अतिथी म्हणून सरपंच ॲड. प्रणित डिकले उपस्थित होते. प्रास्ताविक शिक्षक संतोष मोहिते, सूत्रसंचालन उपक्रमशील शिक्षिका आशा पवार आणि आभारप्रदर्शन रसिका आगरकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी



शिक्षक सयाजी शिंदे, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी सुजाता बनसोडे, शालेय पोषण आहार कर्मचारी रुक्मिणी डिकले, मयुरी डिकले यांनी परिश्रम घेतले. या प्रसंगी ग्राम महसूल अधिकारी, उपसरपंच महावीर डिकले, सुनील काळे, समिती सदस्य जुबेर पठाण, सुहास धाबेकर, गोवर्धन डिकले, माजी केंद्रप्रमुख बोराडे सर, राम माने, नवनाथ काळे, अनंत पोपळे, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ व पालक उपस्थित होते.

## घरकुल लाभार्थ्यांकडून पैसे मागणाऱ्यां स्थानिक अभियंत्यांची हकालपट्टी करा

**घनसावंगी । प्रतिनिधी**

घनसावंगी पंचायत समिती अंतर्गत व तसेच जिल्हा परिषद बांधकाम अंतर्गत इंजिनीयर अभियंता स्थानिक घनसावंगी तालुक्यातील असल्यामुळे घरकुल लाभार्थ्याकडून पैशाची मागणी करीत आहे करता सदरील अभियंताची तत्काळ बदली करा असे मागणी करण्यात येत आहे. सर्व विभागामार्फत सर्व अभियंता हे स्थानिकचे असल्यामुळे ते मनमानी कारभार करत आहेत, त्यांची दुसऱ्या तालुक्यामध्ये बदली करून इतर तालुक्यातील अभियंत्यांची नियुक्ती घनसावंगी प.स. पेथे करण्यात यावी, नसता आम्ही आमरण उपोषण करणार आहे. याप्रकरणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तात्काळ लक्ष देऊन बदली करावे अशी मागणी करण्यात आली आहे . घरकुल पैसे टाकण्यासाठी अभियंते हे स्थानिक घनसावंगी तालुक्यातील असल्यामुळे प्रत्येक लाभार्थ्यांवर पैशासाठी दबाव टाकतात आमचे वडील, नातेवाईक हे कार्यकर्ते आहेत त्यामुळे आमचे कोणीच काही करू शकत नाही अशा पद्धतीने गोरगरीब लाभधारकांवर दबाव टाकतात रूबाब करतात जे लाभार्थी पैसे देतात त्यांची घरकुल न बांधता पैसे टाकतात आणि गरीब वंचित लाभधारक मात्र घर बाधूनही सुद्धा लाभ मिळत नाही. परकुल बांधण्यासाठी अनेक संकटाना तोंड द्यावे लागते व्याजाने पैसे काढून घर बांधकाम करतात आणि सदरील अभियंते हे पैशाची वाट पाहतात. त्यामुळे घरकुल लाभधारकांवर आत्महत्या करण्याची वेळ येत आहे. असे निवेदन जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी जालना, प्रकल्प अधिकारी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जालना तसेच गटविकास अधिकारी पंचायत समिती घनसावंगी यांना देण्यात आली आहे. या निवेदनावर लखन लोंढे, पिराजी सोनवणे, अमोल हिवाळे यांच्या स्वाक्षरी आहे.

## कामगारांची वेतन वाढ करून फरकाची रक्कम देण्याची मागणी

**अंबड । प्रतिनिधी**

**कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखान्यातील कामगारांची वेतन वाढ करुन फरकाची थकित रक्कम देण्याची मागणी अंबड-घनसावंगी उस उत्पादक कामगार संघर्ष समितीची मागणी कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखान्यामधील कामगारांची पगार वाढ व्यवस्थापन देत नाही. या संबंधी मा. प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांना मराठवाडा मुक्ती दिनाच्या (१७ सप्टेंबर २०२५) रोजी समिती सदस्यांनी भेट घेऊन निवेदन दिले.**




साखर कारखाना मालक / चेअरमन प्रतिनिधी / साखर कामगार संघटना / राज्य सरकार प्रतिनिधी यांच्या त्रिपक्षीय समितीच्या झालेल्या बैठकीमध्ये निर्णय झाला ज्यामध्ये कामगारांना वेतन वाढीचा फायदा २६०० ते २८०० एवढा प्रत्येकाला मिळणार आहे. कामगारांची वेतनवाढ आणि सेवाशर्तीच्या अनुषंगाने राज्य शासनाने त्रिपक्षीय समितीची स्थापना केली होती. राज्यातील साखर कामगार वेतनवाढ आणि अन्य मागण्यांची या पुर्वीची मुदत ३१ मार्च २०२४ रोजी संपली होती, नविन करारानुसार शासनाने त्रिपक्षीय समिती स्थापना केली. त्यानुसार १ एप्रिल २०२४ पासुन कुंशल-अकुशल व तांत्रिक कामगारांना १० टक्के वेतनवाढ देऊन ती लागु करण्याचे ठरले. अंबड-घनसावंगी तालुका कार्यक्षना हा याच भागातील असलेल्या कामगारांवर सातत्याने अन्याय करत असतो. या ठिकाणी कामगार कायद्यांची अंमलबजावणी होत नाही. कामगार कलयाण बोर्ड लागु नाही, ज्यामुळे शासनाच्या नियमानुसार त्यांना सुविधा मिळत नाहीत. अंबड-घनसावंगी संघर्ष समिती ही कामगारांच्या हक्कासाठी शासनाच्या माध्यमातुन भविष्यामध्ये हक्कासाठी शासनाच्या माध्यमातुन भविष्यामध्ये व्यवस्थापना सोबत संघर्ष करणार आहे. कामगारांचा न्याय हक्क त्यांना मिळालाच पाहीजे. कर्मयोगी समर्थ कारखान्यामध्ये काही निवडक नातेवाईक कर्मचारी यांना जास्तीचा पगार दिला जातो. पण गरीब कामगाराला मात्र त्यांच्या हक्काचा पगार दिला जात नाही. काही अधिकारी कामगार मात्र करोडपती झाले आणि काहींना मात्र आजही तुटपुंजा पगारावर काम करत घर चालवणे अवघड झाले आहे. त्यामुळे त्यांचा न्याय हक्क त्यांना मिळालाच पाहीजे. १ एप्रिल २०२४ पासुन लागु करण्यात आलेली १० टक्के वेतनवाढ त्वरीत लागु करुन मागील १७ महिन्यांची फरकाची थकित वेतन वाढ रक्कम कामगारांना देण्यात यावी. अशी शेवटची मागणी अंबड व घनसावंगी ऊस उत्पादक शेतकरी व कामगार संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली.

## पान ६ वरून...

### कार्डियाक कॅथलॅबमुळे

मंजूर केला आहे.लवकरच या कामाची सुरुवात करण्यात येणार आहे.जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी विमानतळ उभारणीसाठी जागेचे सर्व्हेक्षण करण्यात येत असल्याचेही ते म्हणाले.यावेळी उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी कोनशीलेचे अनावरण करून व फीत कापून कार्डियाक कॅथलॅबचे लोकार्पण केले.तसेच संपूर्ण कॅथलॅबची पाहणी करून त्याठिकाणी देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली. या कार्यक्रमाला पदाधिकारी, अधिकारी तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

**असे आहे कार्डियाक कॅथलॅब**

सर्वसामान्यांच्यादृष्टीने महत्वपूर्ण अशा कॅथलॅबमध्ये २४ तास कार्यरत कार्डिओलॉजीस्ट व भूलतज्ञ व डॉक्टर उपस्थित राहणार आहेत. कॅथलॅबमध्ये ॲन्जीओग्राफी, ॲन्जीओप्लासटी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. कॅथलॅबमध्ये १० बेडचे सुसज्य आय.सी.यू.असून कार्डियाक इको कार्डियोग्राफीची सोय करण्यात आली आहे.सुसज्य असे शस्त्रक्रिया गृह तयार करण्यात आलेले असून भविष्यात याच ठिकाणी ओपण हार्ट सर्जरीची सुविधाही उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

-----------

### बीड तालुक्यात

यावा, अशी ठाम मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या निवेदनावेळी वंचित बहुजन आघाडीचे बीड तालुका अध्यक्ष किरण वाघमारे, जिल्हा संघटक डॉ. गणेश खेमाडे, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हा अध्यक्ष रोहन मगर, महिला जिल्हा उपाध्यक्षा पुष्पाताई तुरुकमाने, जिल्ह्याचे जंजाळ सर, तालुका संघटक आकाश साबळे, तालुका सहसचिव महादेव गव्हाणे, अक्षय गायकवाड, विनोद वाघमारे, पांडुरंग वाघमारे, महादेव वाघमारे, गौतम वाघमारे यांच्यासह तालुक्यातील असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-----------

### वाळू वाहतूक करणारे

आला असून चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर,पोलीस उपाधीक्षक अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील,अमोल येळे,कैलास खटाने,हनुमान इंगोले यांच्यावतीने करण्यात आली.

-----------

### वाहतुक पोलिस कर्मचारी

काही महिन्यापासून रक्ताच्या कर्करोगाने ते त्रस्त होते. छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात उपचारा दरम्यान त्यांचे दुर्दैवी निधनझाले. श्रीकांत राठोड यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, दोन मुले असा परिवार आहे. श्रीकांत राठोडयांच्या पार्थिव देहावर बीड तालुक्यातील अंतरवन पिंपरी तांडा येथील स्मशानभूमीत सायं. ६ वा.शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. चटका लावणारा अंतपरळी शहर पोलीस ठाण्यात वाहतूक शाखेत गेल्यादोन वर्षापासून कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी श्रीकांत राठोड यांचे अतिशय अल्पावधीत वयाच्या ३८ व्या वर्षी आजाराने दुर्दैवी निधन झाले. यामुळे पोलीस खात्यासह, कुटुंबीय व मित्र परिवारावर एकच शोककळा पसरली आहे. प्रत्येकाच्या जीवाला चटका लागावा असा अंत झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

-----------

### आई वडील हेच खरे दैवत

प्रारंभी सुंदरराव सोळंके यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ.एन. के.मुळे यांनी केले. सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ.एम. ए.कव्हळे यांनी केले तर आभार प्रा. ज्ञानेश्वर कुंडकर यांनी मानले. यावेळी विद्यार्थी विद्यार्थिनी, प्राध्यापक, कर्मचारी,शहरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थितीत होते.

-----------

### परळी रेल्वे स्टेशनला आरोमा

सायरन संबंधित कार्यालय आरपीएफ ऑफिस या ठिकाणी सिंगल मिळेल जेणेकरून गुन्हेगार व्यक्तींना गुन्हा करण्यापासून रोखण्यात रेल्वे आरपीएफ यांना यश येईल असे वरिष्ठ अधिकारी आईजी यांनी आज परळीत पत्रकार परिषद मध्ये सांगितले या वेळी उपस्थित पत्रकार धीरज जंगले,जगदीश शिंदे,बालाजी ढगे,बाबा शेख,प्रकाश वर्मा, दशरथ रोडे, मुक्रम शेख,शेख मुदस्सिर, सय्यद सबाहत अली आदि पत्रकार संपादक बांधव उपस्थित होते.

-----------

### चिखल तुडवत तहसीलदार

-तिकडे पाणीच पाणी खेळताना दिसत आहे यामुळे सहाजिकच शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आले आहे. यामुळे शेतकरी आता सरकारकडून काही मदत मिळते का याची वाट पाहू लागला आहे. शेतामध्ये शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असल्याने प्रशासनही आपल्या आत्मीयतेने कामाला लागले आहे. त्यातच सुरेश घोळवे यांच्या सारखा जागरूक आणि कर्तव्यदक्ष अधिकारी कसा बरे स्वस्थ बसेल? शिरूरचे तहसीलदार सुरेश घोळवे हे गेल्या दोन-चार दिवसापासून पायाला भिंगरी बांधून तालुक्यामध्ये गाव -गाव फिरून शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करत आहेत. अतिवृष्टीमुळे सिंदफणा नदीला पूर आला होता या पुरामुळे नदी लगतच्या शेतामध्ये पाणी शिरूर शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्याचबरोबर अतिवृष्टीमुळे ही इतरत्र शेतामध्ये ही मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे उभ्या पिकांचे मोठे नुकसान होताना दिसत आहे. शिरूरचे तहसीलदार सुरेश घोळवे यांनी बुधवार दि. १७ सप्टेंबर रोजी तिंतरवणी महसूल मंडळाचा दौरा करून फुलसांगवी परिसरातील शिवारामध्ये चिखल तुडवत शेतकऱ्यांच्या थेट बांधावरती जाऊन नुकसानीची पाहणी केली आहे. या दौऱ्या दरम्यान त्यांनी प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना शेतकऱ्यांच्या शेतामध्ये जाऊन तात्काळ पारदर्शक पंचनामे कराव असे आदेश दिले आहेत. या दौऱ्यामध्ये नायब तहसीलदार विजय इंगळे, तिंतरवणीचे मंडळाधिकारी निशांत ठाकूर, तलाठी राहुल गोरडे, कृषी सहाय्यक वनगुजर ग्रामपंचायत अधिकारी भारत सानप आदी प्रशासकीय कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

-----------

### आष्टीच्या तहसीलदाराला

पूजनाचा कार्यक्रम झाला त्यावेळी प्रतिमेची पूजन करत असताना यांना मुक्ती संग्राम दिनाचे जनक पोलादी पुरुष सरदार वल्लभाई पटेल यांच्या प्रतिमेचा विसर पडला उपस्थित आम्ही प्रतिमा नसल्याचा सूचना केली यावर तहसीलदार यांनी कसलेही उत्तर न देता प्रतिमेचे पूजन केले या पूजनामध्ये घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे जनक स्वामी रामानंद तीर्थ हे सोडता या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे खरेखुरे जनक गोविंद भाई क्रॉप व सरदार वल्लभभाई पटेल यांचा विसर पडल्याचे दिसून आले.

-----------

## पान १ वरून...

### पंचनाम्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांच्या

पाचोड ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आला. पण नातेवाईकांनी ठाम भूमिका घेतली की, जोपर्यंत मंडलाधिकारी, तलाठी आणि ठेकेदाराविरुद्ध गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत आम्ही पुढील वैद्यकीय तपासणी होऊ देणार नाही. त्यामुळे रुग्णालयाबाहेर मोठा तणाव निर्माण झाला होता. या सर्व घटनेनंतर, सायंकाळी पोलिसांनी खात्री दिली की सर्व दोषींवर कायदेशीर कारवाई होईल. त्यानंतरच नातेवाईकांनी मृतदेह तपासणीसाठी मान्य केले. रात्री उशिरापर्यंत तपासणीचे काम पार पडले. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

-----------

### रब्बीसाठी १२ लाख मॅट्रिक

टाळण्यासाठी ऑगस्ट महिन्यातील वाटपाची तातडीने पूर्तता करावी, तसेच प्रलंबित आयात पुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केली आहे. माहे ऑगस्ट- सप्टेंबर मध्ये झालेल्या पावसामुळे रब्बी हंगामाचे क्षेत्र वाढणार असून आगामी रब्बीसाठी १२ लाख मॅट्रिक टन युरियाच्या प्रस्तावाला मंजुरी द्यावी, अशीही विनंती केंद्र सरकारकडे केली.

-----------

### बीडच्या जनतेच्या स्वप्नपूर्तीचा

कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, मध्य रेल्वे महाप्रबंधक धर्मवीर मीणा, विभागीय रेल्वे प्रबंधक राजेशकुमार वर्मा आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले, रेल्वे संघर्ष समितीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हा दिवस शक्य झाल्याचे सांगुन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ''हा दिवस श्रेयवादाचा नसून आनंदाचा आहे. बीडमध्ये रेल्वे सुरू होणे म्हणजे फक्त गाडी पोहोचणे नव्हे तर विकासाची वाहिनी पोहोचणे आहे. सन २०१४ नंतर आमच्या सरकारने या प्रकल्पाला गती दिली. केंद्र व राज्याने ५० टक्के हिस्सा देत प्रकल्प पूर्णत्वाकडे नेला. रेल्वेचे विद्युतीकरणही लवकरच पूर्ण होईल आणि यामुळे प्रवास अधिक सोयीस्कर आणि वेगाने होईल.'' असे ते म्हणाले. मराठवाडा मुक्ती दिन आणि रेल्वे प्रकल्पाचा आनंद दुहेरी असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ''गेल्या दहा वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठवाड्यासाठी रेल्वे प्रकल्पांना तब्बल २१ हजार कोटी रुपये दिले. ज्यामुळे विकासाच्या दिशा खुल्या झाल्या. सरकार मराठवाड्यातील दुष्काळ संपवण्यासाठी वचनबद्ध असून, पाण्याचे जाळे निर्माण करण्यासाठी कृष्णा व उल्हास खोऱ्यातील पाणी आणण्याचे मोठे प्रकल्प राबवले जातील.'' असे त्यांनी सांगितले. खासदार रजनी पाटील, खासदार बजरंग सोनवणे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मध्य रेल्वेचे महाप्रबंधक धर्मवीर मिणा यांनी केले. प्रारंभी मंचावर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या डॅशबोर्डचे उद्घाटन आणि बीड शहर पोलीस स्टेशनचे व २४१ पोलीस निवासस्थानाचे उद्घाटन ऑनलाईन पध्दतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. कार्यक्रमाला लोकप्रतिनीधी, विविध विभागाचे अधिकारी तसेच नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------

### मतपत्रिकेवर दिसणार

सुलभ हा आहे. मतदारांसाठी सोयी सुविधा वाढवण्यासाठी गेल्या ६ महिन्यात निवडणूक आयोगानं २८ उपक्रम घेतले होते. त्याच्याशी हा निर्णय सुसंगत आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने बुधवारी आपल्या डिझाईनिंगच्या गाईडलाईन्समध्ये बदल केला. आता ४९ बी नियमाअंतर्गत इव्हीएम मतपत्रिकेच्या प्रिंटिंगमध्ये बदल करण्यात आला आहे. हा नियम १९६१ चा आहे. याचा उद्देश हा मतपत्रिका ही जास्त मतदार फ्रेंडली बनवणे हा आहे. निवडणूक आयोगोने गेल्या सहा महिन्यात २८ अनेक उपक्रम हाती घेतले होते. इव्हीएम मतपत्रिकेवर फोटो हा देखील याचाच एक भाग आहे. याचबरोबर निवडणूक आयोगाने उमेदवारांचे सीरियल नंबर देखील डिस्प्ले करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर नोटाचा पर्याय देखील अधिक ठळकपणे देण्याचा निर्णय घेतला आहे. याचबरोबर आता मतदान पत्रिका ही ७० जीएसएम पेपरवर प्रिंट करण्याचा देखील निर्णय निवडणूक आयोगानं घेतला आहे. विधानसभेच्या निवडणुकीवेळी मतदान पत्रिका ही पिंक कलरमध्ये असणार आहे.

---------

### बीडला प्रगत जिल्ह्याच्या अग्रस्थानी

हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली. तर पोलिस जवानांनी हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडून व पोलिस बँड पथकाने शोक धून वाजवून हुतात्म्यांना मानवंदना दिली. यावेळी आमदार विक्रम काळे, धनंजय मुंडे, विजयसिंह पंडित, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. पवार म्हणाले, मराठवाडा मुक्तीसंग्राम हा मराठवाड्यातील जनतेचा लढा होता. अंबाजोगाई आणि बीड या लढ्याचा केंद्रबिंदू होता. हा लढा लोकांनी त्यांच्या गावागावात लढवला. या लढ्यात मराठवाड्यातील सामान्य शेतकरी, कष्टकरी, महिला मोठ्या संख्येने सहभागी होते, त्यासाठी त्यांना मोठी किंमत चुकवावी लागली. हा संघर्ष केवळ राजकीय नव्हता तर तो सामाजिक समतेचा, स्वाभिमानाचा आणि स्वातंत्र्याचा लढा होता असे सांगितले. जिल्ह्याच्या विकासाबाबत बोलताना पवार म्हणाले की, मागील काही महिन्यात आपण अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले आहे. बीड विमानतळ विकास प्रकल्प हाती घेतला आहे. जिल्ह्यातील युवकांना तंत्रज्ञान आधारित कौशल्य मिळावे म्हणून सिट्रीपलआयटी प्रकल्प उभारणीस गती देण्यात आली आहे. टाटा टेक्नॉलॉजीज आणि एमआयडीसी यांच्या सहकार्याने १९६ कोटी ९८ लक्ष रुपयांचा हा प्रकल्प लवकरच प्रत्यक्षात साकारणार असल्याचे ते म्हणाले.

पवार पुढे म्हणाले, परळी वैजनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला सुधारीत ३५१ कोटी रुपयांची मान्यता देण्यात आली आहे. बीडच्या श्री कंकालेश्वर मंदिर परिसराचा विकास करण्यात येणार आहे. नवीन प्रशासकीय इमारत बीड येथे उभारण्यात येणार आहे. सहकार भवनाचीही इमारत उभारण्यात येणार आहे. जिल्हा क्रीडा संकुलासाठी अतिरिक्त २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. परळीत नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयासाठी ५५० कोटी रुपये मंजूर केले असल्याचे ते पवार म्हणाले.

जिल्ह्यात पोलीस विभागाच्या विविध उपक्रमांमुळे नागरिकांचा विश्वास वाढला असून, गंभीर गुन्ह्यात घट झाली असल्याचे सांगून पवार म्हणाले की, जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या आहेत. पोलीस दलाच्या बळकटीकरणासाठी दर्जेदार वाहनांची खरेदी करण्यात आली आहे. अंबाजोगाई वैद्यकीय महाविद्यालय आणि जिल्हा रुग्णालयाच्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही असे पालकमंत्री श्री. पवार यावेळी म्हणाले. मागच्या दोन-तीन दिवसांपासून जिल्ह्याला मुसळधार पावसाचा तडाखा बसल्याचे सांगून पवार म्हणाले की, पुरामुळे नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली, त्यामुळे जिल्ह्यातील काही नागरिकांचे तात्पुरते स्थलांतर करावे लागले. या परिस्थितीवर माझे मंत्रालयातून बारकाईने लक्ष होते. जिल्ह्यातील या परिस्थितीची माहिती जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून घेत होतो. पूरग्रस्तांना आणि बधितांना तातडीने मदत करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य नागरिकांना वाऱ्यावर सोडणार नाही. शेतपिकांचे आणि पशुधनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत शासन शेतकरी आणि पशुपालकांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याची ग्वाही पवार यांनी यावेळी दिली. यावेळी पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून आत्महत्या केलेल्या किंवा मृत्युमुखी पडलेल्या धीरज म्हस्के, महेश शेळके, सुनील वाकुरे आणि भागवत गायके यांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून मदतीच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले. संजय मोरे, वसीम खान, मनीषा मस्के, कमलाक्षी देशमुख व अयोध्या बांगर यांना कायम शिक्षकांचे आदेश वाटप केले. यावेळी नैसर्गिक आपत्तीमध्ये पुरात वाहून गेलेल्या व्यक्तींचे बचाव कार्य करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये अंबाजोगाईचे सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषीकेश शिंदे, सिरसाळाचे मंडळ अधिकारी उमेश कुदळे, नाथ्राचे ग्राम महसूल अधिकारी कृष्णा मुंडे, परळी तहसीलचे महसूल सहाय्यक वसीम शेख, रामेवाडीचे राजाभाऊ पौळ, बाबूराव रुपनर, खामगावचे रुपचंद लाकडे, छोटुराम लाकडे, मारुती लाकडे, रूपेश लाकडे, दत्तात्रय गव्हाणे, दिलीप राठोड यांचा, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवडा शुभारंभ करुन लाभार्थ्यांना लाभ वाटप करण्यात आले. हैद्राबाद गॅझेटिअरमधील नोंदीनुसार कुणबी प्रमाणपत्र सतीष कदम, बाबुराव डोके, रघुनाथ कदम, व सतीष जाधव यांना वितरण करण्यात आले. सर्वांसाठी घरे या योजने अंतर्गत वाटप केलेल्या / अतिक्रमण नियमानुकल केलेल्या बप्पा ऊपळकर, अमजद पठाण, प्रकाश नरनाळे, बाबू मामडे, रियाज चाँद, गौतम साबळे, अशोक लोखंडे, संभाजी वाघमारे, कमलाकर वाघमारे, अशुकेत वैरागे, हनुमान वाघमारे, दिपक वाघमारे, सुनिल वाघमारे, अमोल वाघमारे, गोविंद वाघमारे यांना जमीनीचे पट्टे वाटप करण्यात आले. पाणंद रस्ते सातबारावर नोंदी घेतलेले व सातबारा व फेरफार वाटप विष्णु दुसांगे, संदिप महारनोर, असराबाई खेडकर यांना करण्यात आले. यावेळी पोलीस अधिक्षक कार्यालयास प्राप्त झालेल्या ४५ वाहनांचे व नगर परिषद बीड यांनी खरेदी केलेल्या वाहनांचे लोकार्पण पालकमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले.

----------

### मराठ्यांची आता दिल्ली

कधीतरी एकत्र आले पाहिजेत. त्याचा पायंडा पडला पाहिजे. आमचा तो गोतवळा आहे. हरियाणा, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, कर्नाटक, आंध्रा, तामिळनाडू, दिल्ली, गोवा येथील मराठे आम्ही एकमेकांचे भाऊ आहोत. आता आम्ही प्रत्यक्ष ऐकमेकांना भेटणार आहोत, कडकडून मिठी मारणार आहोत. एक दिवस दिल्लीला भेटायचे ठरलेले आहे. त्यानिमित्त मोठे अधिवेशन होणार आहे, अशी माहिती जरांगे पाटलांनी दिली. आमच्या राजाने अटकपासून कटपर्यंत आणि अफगाणिस्तानपर्यंत भगवा फडकवला होता. दिल्लीत भगवा फडकवला, त्या शौर्याची आठवण करण्यासाठी नवीन पायंडा आम्ही पाडणार आहोत. दिल्लीमध्ये मराठ्यांची एकजूट दिसून येईल.

----------

### पितृपक्षात गोपीनाथ मुंडे

ठेवण्यासाठी असतो. मुख्यमंत्र्यांनी पितृ पक्षांमध्ये हा कार्यक्रम होत असल्याची जाणीव करताना बीड रेल्वेसाठी स्व.गोपीनाथ मुंडे यांचे योगदान किती आहे हे सांगितले आणि हा पितृपक्ष आहे त्यामुळे हे प्रेम मुंडे साहेबांना देत आहे, असे बोलताना स्पष्ट केले. मात्र हे करत असताना मुंडे यांचा वारसा चालवणाऱ्या कन्या पंकजा मुंडे, पुतणे धनंजय मुंडे यांना एक प्रकारे बीड जिल्ह्याच्या राजकारणात आणि राज्याच्या राजकारणात पाठबळ दिल्याचे दिसते. तसे पाहता गोपीनाथ मुंडे यांचे बीड रेल्वेसाठी मोठे योगदान आहे. त्यांचे मित्र असलेले तात्कालीन काँग्रेसचे स्व.मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी हा प्रकल्प केंद्राने राज्याच्या माध्यमातून मंजूर करून मान्यता दिली. त्यामध्ये गोपीनाथ मुंडे यांचे मोठे योगदान होते हे स्पष्ट होत आहे. त्याच माध्यमातून मुख्यमंत्र्यांनी बीड - आहिल्यानगर रेल्वे शुभारंभ प्रसंगी पितृ पक्षाचा उल्लेख करत गोपीनाथ मुंडेंना जी उपमा दिली ती पित्यासमान दिली आणि हा प्रकल्प त्यांच्यामुळे झाला हे सांगायला ते विसरले नाहीत. हे सांगत असताना त्यांनी पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांना राजकीय पाठबळ दिल्याचे यातून दिसून आले. या कार्यक्रमाला बीडचे खासदार बजरंग सोनवणे, राज्यसभेच्या खासदार रजनीताई पाटील व लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकंदरीत रेल्वे आली या आनंदाचा विषय आहेच, मात्र त्याचवेळी मुख्यमंत्र्यांनी गोपीनाथ मुंडे यांचा केलेला उल्लेख म्हणजे योग्य वेळी योग्य सन्मान आणि त्यातच स्वर्गीय मुंडे यांचे नाव घेताना त्यांना वडलाची उपमा देताना धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांचे राजकीय वजन वाढवले असल्याची चर्चा सर्वत्र होत आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार दि. १८ सप्टेंबर २०२५

३



बीड : जिल्ह्यातील टीम देवेंद्र यांच्याकडून राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत खोबऱ्याचा हार घालून केले. बीड जिल्ह्यात विशेष लक्ष देऊन देवाभाऊ यांनी रेल्वेसह अनेक विकास कामांना करोडो रुपयांचा निधी मंजूर करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी युवा नेते संभाजी सुर्वे, राजु शहाणे, गणेश जायभाये, राहुल जोगदंड, ॲड. योगेश पवार, ए.एस.गोलु आदी उपस्थित होते.

## थोडक्यात...

### जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या रिंगणात तीन पत्रकार उतरणार

पाटोदा प्रतिनिधी

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा बिगुल केव्हाही वाजणार असल्याने राजकीय वर्तुळात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. आपले राजकीय अस्तित्व दाखवण्यासाठी तसेच नवनिर्वाचित उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुकांनी दिग्गज नेत्यांच्या दाराशी धाव घेतली आहे.

तालुक्यातील महत्त्वाच्या जागांसाठी इच्छुक कार्यकर्ते, माजी पदाधिकारी व नवे चेहरे यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर हालचाली सुरू असून मुलाखती व बैठकींचे सत्र वाढले आहे. उमेदवारी निश्चित करण्यासाठी राजकीय पक्षांच्या गोटात चर्चा तापल्या आहेत. पक्षीय समीकरणे, जातीय गणिते आणि स्थानिक मतदारसंघातील मतदारसंघटन या तिन्ही घटकांचा बारकाईने विचार करूनच तिकीट वाटप होणार असल्याचे समजते. त्यामुळे इच्छुकांना उमेदवारी मिळावी यासाठी स्थानिक पातळीवरील संपर्क वाढवण्यासोबतच दिग्गज नेत्यांना पटवून देण्याची चढाओढ सुरू आहे.दरम्यान, ग्रामीण भागातील मतदारांमध्येही निवडणुकीबाबत उत्सुकता दिसून येत असून, आगामी काळात तालुक्यातील राजकीय घडामोडींना वेग येणार आहे.

### बालाजी साबळे यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी



येथील फुले नगरचे रहिवासी बालाजी तुकाराम साबळे (४६ वर्षे )यांचे अल्पशा आजाराने अंबेजोगाई येथील शासकीय रुग्णालयात दुःखद निधन झाले. ते भाजपाचे सक्रीय कार्यकर्ते राहिले आहेत.अत्यंत मनमिळाऊ व्यक्तिमत्व म्हणून ते प्रसिद्ध होते.श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. अंकुश साबळे यांचे ते कनिष्ठ बंधू होते.त्यांच्या पश्चात वडील,पत्नी, मुलगा,दोन भाऊ, एक बहीण आणि त्यांचा परिवार आहे.

### सुरूमगांवात मुक्ती संग्राम दिन साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील सुरूमगांव येथील ग्रामपंचायत कार्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



सरपंच सारिका माने व उपसरपंच उषा माने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी चेअरमन शिवकुमार माने, दादासाहेब माने,ग्राम.पं.सदस्य बाळासाहेब खराडे,दिपक माने, अनिता माने,पशुपती गुळभिले, मुख्याध्यापक बी.एल.सुरेवाड,रंजीत जोगडे,शेखर माने,दत्तात्रय माने,लक्ष्मण माने,प्रल्हाद माने यांच्यासह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### महाराणी ताराबाई विद्यालयात मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि प्रमोद महाजन इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचा ७७ वा वर्धापन दिनानिमित्त बुधवार दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी मुख्य ध्वजारोहण सोहळ्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक,सचिव तथा चौसाळा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या शुभहस्ते सरदार वल्लभाई पटेल,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,थोर क्रांती सेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करून भारतीय राष्ट्रीय तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले राष्ट्रगान झाल्यानंतर त्यांच्या हस्ते शाळेच्या प्रारंगणात वृक्षारोपण करण्यात आले.याप्रसंगी संस्कार शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री.अनिलदादा चोले, सेवानिवृत्त मुख्याध्यापक मधुकररावजी धस सर,श्री. दत्ताजी चोले,सेवानिवृत्त शिक्षक उत्तरेश्वररावजी धस सर,वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे युवा संचालक रणजीत भैय्या धस,शाळेच्या संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे,विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे-डोईफोडे मॅडम,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्री.डोईफोडे सर,आरएसपी प्रमुख श्री.ठोंबरे सर आदीमान्यवर उपस्थित होते.

# पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा शुभारंभ

बीड । प्रतिनिधी

मराठवाडा मुक्ती दिनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभ हस्ते या योजनेचा शुभारंभ ग्रामपंचायत किनगाव छत्रपती संभाजी नगर येथून लाईव्ह प्रक्षेपणाने झाले आहे त्याच धर्तीवर आपल्या जिल्ह्याचा शुभारंभ जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या शुभहस्ते ग्रामपंचायत काकडहिरा येथून करण्यात आला.



महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागाकडुन ०६ ऑगस्ट, २०२५ पासून मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान सुरु करण्यात आले. यावेळी बोलताना अजित दादा म्हणाले की, अभियानाचा कालावधी दि.१७ सप्टेंबर ते ३१. डिसेंबर २०२५ पर्यंत आहे. ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्या कार्यक्षेत्रात केंद्र, राज्य शासनाच्या सर्व योजनांची अंमलबजावणी गतिमानकारक व स्पर्धात्मक होण्यासाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व ग्राम अशा पाच स्तरांवर नागरिकांना स्वयंस्फूर्तीने सहभागी करून घेण्याकरिता प्रथमतःच ''मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान'' राज्यात राबविण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश गावा-गावांमध्ये विकासाची निकोप स्पर्धा निर्माण करणे, सुशासन प्रस्थापित करणे आणि गावाला आत्मनिर्भर करणे हा आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या या महत्त्वाकांक्षी राज्यस्तरीय अभियानाचा शुभारंभ बुधवार दि. १७ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी १०.०० वा. मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत किनगांव, ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर, येथे आयोजित केला आहे. तसेच, सदर राज्यस्तरीय कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण प्रादेशिक विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत या चारही स्तरावर करण्यात येत आहे.राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात आणि ग्रामपंचायत मध्ये आज पासून याची अंमलबजावणी

ग्रामसभेच्या माध्यमातून होत आहे. त्या अनुषंगाने राज्याचे उप मुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजीतदादा पवार हे बीड तालुक्यातील काकडहीरा ग्रामपंचायत येथुन जिल्ह्याचा मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाचा शुभारंभ केला,राज्यात सदर अभियान सुरु करण्याचा ऐतिहासीक निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. हे अभियान केवळ एक शासकिय उपक्रम नाही तर आत्मनिर्भर आणि समृध्द महाराष्ट्र घडविण्यासाठीची एक मोठी लोक चळवळ आहे.

यावेळी विधान परिषदेचे आ.विक्रम काळे, नारायण गडाचे महंत ह भ प शिवाजी महाराज ,माजी मंत्री तथा आ. धनंजय मुंडे, आ. विजयसिंह पंडित, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान , पोलीस अधीक्षक नवनीत काँवत,राजेश देशमुख,योगेश क्षीरसागर, कल्याण काका आखाडे, बळीराम आप्पा गवते, आधी मान्यवर सहित ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक काकडहिरा ग्रामपंचायतच्या सरपंच सौ प्रीती अमोल बागलाने यांनी केले तर उपमुख्य कार्यकारी अधिकारी किशोर काळे यांनी आभार मानले.

## जिल्ह्यात अतिवृष्टी तरी फुलसांगवी तलाव अद्याप अतृप्तच

### सिंदफणेचे पाणी साठवण तलावात सोडण्यासाठी फुलसांगवीकरांनी केली आमरण उपोषणाला सुरुवात

शिरूर । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये दोन दिवसापासून अतिवृष्टी मुळे सर्वत्र हा..हा.. कार मातला आहे. नुकसान ग्रस्त शेतीचे नुकसान झाले म्हणून डोक्याला हात लावून बसले आहेत. शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे व्हावेत आणि नुकसानीची भरपाई मिळावी यासाठी शेतकरी शासन -प्रशासनाकडे आर्त मागणी करत आहेत. तर दुसरीकडे जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी होऊनही आमच्या तलावात अद्याप भरभरून पाणी आले नाही. गेल्या अनेक वर्षापासून तलावाची तहान भागत नसल्यामुळे जवळून जाणाऱ्या सिंदफणेचे पाणी साठवण तलावात सोडावे यासाठी आता फुलसांगवी परिसरातील शेतकरी आमरण उपोषण




करू लागले आहेत.

शिरूर कासार तालुक्यातील मौजे फुलसांगवी या गावाच्या शिवारामध्ये १९ वर्षांपूर्वी कोट्यावधी रुपये खर्च होऊन साठवण तलाव बांधण्यात आला आहे. या तलावामध्ये शेतकऱ्यांची शेकडो एकर जमीन बुडीत झाली आहे. फुलसांगवी गावचे पुनर्वसन ही झाले आहे. फुलसांगवी चा साठवण तलावाला पाणी आले म्हणजे आपला परिसर सुजलाम सुफलाम होईल हे स्वप्न उराशी बाळगून या परिसरातील शेतकरी दरवर्षीच तलाव भरावा यासाठी देवाकडे याचना करत असतो मात्र एक वर्ष अपवाद सोडता हा तलाव दुसऱ्यांदा पूर्ण क्षमतेने भरला नाही. या तलावामध्ये जवळून वाहणाऱ्या सिंदफणा नदीचे पाणी लिफ्टच्या माध्यमातून सोडले तर या परिसरातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल.

#### आ. संदीप क्षीरसागर यांनी केली होती लक्षवेधी

सिंदफणेचे पाणी फुलसांगवीच्या साठवण तलावात सोडण्यासाठी बीड विधानसभेचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी हिवाळी अधिवेशनामध्ये लक्षवेधी करून शासनाच्या दरबारी मागणी केली होती. मात्र अद्याप तरी या कामी ठोस कारवाई होताना दिसत नसल्याने ग्रामस्थ ग्रामस्थ आक्रमक होऊन आमरण उपोषण करू लागले आहेत.

यासाठी फुलसांगवी गावचे ज्येष्ठ नागरिक रामकिसन जायभाये यांनी गेल्या सहा वर्षापासून प्रशासनाचे उंबरठे झिजवून या मागणीसाठी पाठपुरावा चालवला आहे.

## स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान



बीड । प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने महिलांच्या आरोग्याचा आणि त्यांच्या सक्षमीकरणांचा विचार करुन सशक्त नारी, सशक्त परिवार या अभियानाचे उद्धाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज मध्यप्रदेशातील धार येथुन करण्यात आले. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीड येथुन ऑनलाईन पध्दतीने आपली उपस्थिती दर्शविली.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे, खासदार रजनी पाटील, खासदार बजरंग सोनवणे, आमदार सर्वश्री विक्रम काळे, धनंजय मुंडे, विजयसिंह पंडित, आमदार श्रीमती नमिता मुंदडा, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आदी उपस्थित होते.

## कै.चांदमलजी लोढा विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा

**चौसाळा । प्रतिनिधी**

प्रियदर्शनी शिक्षण प्रसारक मंडळ चौसाळा, ता. जि. बीड च्या अध्यक्षा सौ संगीताताई अशोक लोढा व प्रियदर्शनी शिक्षण प्रसारक मंडळ चौसाळा चे सचिव तथा जिल्हा परिषद सदस्य व भाजपा शहराध्यक्ष मा. अशोक चांदमल लोढा साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली १७/०९/२०२५ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.




कार्यक्रमाचे अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री अजाउद्दीन मुजावर तसेच गावातील नागरिक व पत्रकार बंधू यांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण आजउद्दीन मुजावर यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रम प्रसंगी श्री मेघनाथ चौधरे, कीर्तीकुमार शेटे, अजित साळुंके उपस्थित होते. माध्यमिक विभागाचे श्री. उमेश खाकरे यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून सांगितले. व विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आला.

याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री रिठ्ठे व्ही.बी शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री खाकरे एस ए , श्री तांदळे ए. एन ,श्री महामुनी एस एस श्री राऊत जे.एन, श्री वाघ आर बी श्री जाधव एम आर, माध्यमिक विभागाचे श्री पवार सर खाकरे सर शेख सर, वाघमारे मॅडम, पूजा सोनवणे मॅडम, भवर मॅडम, सोनवणे मॅडम, सुलभा काळे, लोढा मावशी यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागाचे विभाग प्रमुख श्री महामुनी सर यांनी केले व आभार श्री राऊत सर यांनी मानले व कार्यक्रम पार पाडला.

## माजलगावमध्ये राष्ट्रीय लोक अदालतीत ५८ प्रकरणे निकाली

माजलगाव । प्रतिनिधी

तालुका विधी सेवा समिती व वकील संघ माजलगाव यांचे संयुक्त विद्यमाने दि.१३ सप्टेंबर शनिवार रोजी जिल्हा व सत्र न्यायालय,माजलगाव येथे तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष श्रीमती राजश्री प.परदेशी जि.न्या.-१ यांच्या मार्गदर्शनाखाली लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते.या लोकन्यायालयात एकुण ५८ प्रकरणे निकाली निघाले असुन एकुण रक्कम ४५ लाख ३ हजार ९४० ऐवढी वसुल झाली आहे.



यावेळी लोक न्यायालयासाठी पँनल क्र.१ वर जिल्हा न्यायाधीश-१ श्रीमती राजश्री प.परदेशी मँडम यांनी काम पाहिले.पँनल क्र.२ वर दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) एस.एस बुद्रुक यांनी काम पाहिले.पँनल क्र.३ वर सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) डि.एन.चामले यांनी काम पाहिले.पँनल क्र.४ वर दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) आर. बी.पौळ.यांनी काम पाहिले.पँनल क्र.५ वर सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) जि.एस.खुपसे यांनी काम पाहिले.तर लोकन्यायालय यशस्वी होण्यासाठी वकील संघ व सदस्य माजलगाव यांनी प्रयत्न केले.

## ढगफुटीमुळे शेती पिके अन् वाहनांचे अतोनात नुकसान





**आष्टी तालुक्यातील म्हसोबावाडी येथे नदी काठालगत असणाऱ्या वस्तीवरील बरीच वाहने गेली नदीपात्रात वाहून**

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

तालुक्यात दि.१५ सप्टेंबर रोजी रात्री झालेल्या आष्टी तालुक्यात ढगपोटी मुळे म्हसोबावाडी गाव व परिसरात येथील अवकाळी अतिवृष्टीमुळे झाली त्यात मालकी हक्काची शेती व व वाहने वाहून गेली त्यात मौजे.म्हसोबावाडी येथील शिवदास आश्रुबा शेकडे यांची फोर व्हीलर गाडी वाहुन गेली. त्याचप्रमाणे प्रशांत विठ्ठल बडे यांची पिकअप वाहुन गेले. त्याप्रमाणे नामदेव देवराव शेकडे,रावसाहेब आश्रुबा शेकडे, पोपट आश्रुबा शेकडे यांची मोटार सायकल वाहून गेली. त्याच प्रमाणे सर्व शेतळ्यांची उभी सोयाबीन व इतर सर्व पिक वाहून गेली. व अतोनात नुकसान झाले शासनाने विनंती आहे की आम्हाल नुकसान भरपाई मिळावी.

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त पाटोद्यात मसानजोगी समाजाला जातीय प्रमाणपत्र वाटप

पाटोदा । प्रतिनिधी

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून पाटोदा तालुक्यातील मसानजोगी वस्ती येथे एक भव्य शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिराचे आयोजन राजे छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान तसेच राजे उमाजी नाईक कागदपत्र अभियान या शासनमान्य उपक्रमांतर्गत करण्यात आले होते.या विशेष शिबिराचे आयोजन भटके विमुक्त विकास परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांच्या पुढाकाराने तसेच बीड जिल्हा अभियान प्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.या उपक्रमांतर्गत वस्तीतील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा, त्यांच्याकडे आवश्यक कागदपत्रांची कमतरता भासू नये यासाठी आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, रेशन कार्ड, जातीचे प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रांचे वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे अनेक वर्षांपासून जातीच्या प्रमाणपत्रासाठी भटकंती करणाऱ्या



मस्कानजोगी समाजातील कुटुंबांना या शिबिरामध्ये अधिकृत जातीचे दाखले मिळाले. त्यामुळे समाजबांधवांमध्ये मोठा उत्साह व समाधानाचे वातावरण होते.

शिबिराचे उद्घाटन व मार्गदर्शन पाटोदा उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार साहेब यांच्या हस्ते झाले. त्यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती देत समाजाने शिक्षण,आरोग्य, रोजगार याकडे अधिक लक्ष द्यावे, शासन सर्वतोपरी पाठबळ देईल असे आश्वासन दिले.या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी भटके विमुक्त विकास परिषद बीड जिल्हा अभियान प्रमुख बबनजी गिरी यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाला उपस्थित राहून समाजबांधवांना मार्गदर्शन करणाऱ्यांमध्ये गोरे सर, नगरसेवक सतीश घोलप, शिवाजी जाधव, महामुनी, संदीप सोनवणे, विकास जाधव, बंडुशेठ कांकरीया, सागर वाघ यांच्यासह इतर मान्यवरांचा समावेश होता.समाजातील नागरिकांना मिळालेल्या जातीच्या दाखल्यामुळे भविष्यात शैक्षणिक प्रवेश, नोकरी व इतर शासकीय योजनांचा लाभ घेणे सुलभ होणार आहे. या शिबिरामुळे मस्कानजोगी समाजामध्ये आनंदाचे वातावरण असून, समाजाने शासनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.

## विश्व हॉस्पिटलचा रुग्णसेवेचा वसा अखंडपणे चालूच

बीड । प्रतिनिधी

बीड सारख्या मागासलेल्या शहरात आपल्या शहराची गरज ओळखून गेल्या ५ वर्षांपासून प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर हे विश्व हॉस्पिटल च्या माध्यमातून अविरत सेवा देत आहेत त्यांनी आज वर अतिशय जोखमीच्या व गुंतागुंतीच्या समजल्या जाणाऱ्या अवघड व किचकट अशा मेंदूच्या शस्त्रक्रिया करून अनेकांना पुनर्जन्म तर दिलाच आहे पण ओपीडी च्या माध्यमातून देखील हजारो रुग्णांना रात्र रात्र न मिळणारी झोप आज शांत झोपेत रूपांतरित करून त्यांचे दुःख दूर केले आहे तसेच अनेक वेळा पुणे , मुंबई सारख्या मोठ्या शहरातील नावाजलेले डॉक्टर्स व हॉस्पिटल



च्या माध्यमातून अनेक प्रकारच्या भव्य आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून देखील सेवेचे हे व्रत अखंड पणे चालूच आहे तसेच हजारो रुग्णांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या समाधानी प्रतिक्रिया देखील मिळत आहेत त्यामुळे दरवर्षी प्रमाणे

येत्या गुरुवार दिनांक १८ सप्टेंबर २०२५ रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधून विश्व हॉस्पिटल बीड व सह्याद्री हॉस्पिटल पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथील नामांकित न्यूरोसर्जन सचिन महाजन व बीड येथील बीड करांच्या नसांचा उपचार करत बीड करांची नस ओळखणारे आपल्या प्रेमळ स्वभाव व आपुलकीने बोलण्यामुळे सर्वांना आपल्या घरातीलच एक वाटणारे आपले लाडके व प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर यांच्या उपस्थितीत भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे याचा सर्व रुग्णांनी लाभ घ्यावा. शिबिरामध्ये (मेंदूचा आलेख ) सारखी तपासणी देखील योग्य दरात करण्यात येणार आहे तसेच या दोन्ही तज्ञ डॉक्टरांची उपस्थिती राहणार आहे..! सर्वांनी आपल्या आसपासच्या लोकांना,नातेवाईकांना, मित्र मंडळींना दिनांक १८ सप्टेंबर गुरूवार रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत विश्व हॉस्पिटल शिवाजी नगर पोलिस स्टेशन च्या बाजूला, बार्शी रोड, बीड या ठिकाणी ०२४४२-२९५१५१ ८२०८९५२४४२ या नंबरवर नाव नोंदणी करून या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन विश्व हॉस्पिटल चे सर्वेसर्वा डॉ विशाल पिंगळकर सर व विश्व हॉस्पिटल च्या सीईओ डॉ. सौ. स्वप्नजा विशाल पिंगळकर आणि विश्व हॉस्पिटल यांच्या वतीने करण्यात आले आहे.

cmyk

# ऑगस्ट-सप्टेंबरच्या अतिवृष्टीमुळे राज्यातील लाखो हेक्टर पाण्यात

महाराष्ट्रात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तब्बल ३० जिल्ह्यांमध्ये शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात आले आहेत. गेल्या दोन महिन्यांमध्ये राज्यात पावसाचे थैमान चालू असून, पुर आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात राज्यातील १,७८५,७१४ हेक्टर (४,२८४,८४६ एकर) क्षेत्र अतिवृष्टीमुळे बाधित झाले आहे. या काळात प्रामुख्याने खरीप पिकांचे नुकसान झाले असून, सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग यासोबतच भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद यांनाही मोठा फटका बसला आहे.

''ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीनंतर काही जिल्ह्यातले पंचनामे पूर्ण होऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे. उर्वरित क्षेत्रांच्या पंचनाम्याचे काम युद्ध पातळीवर सुरू असून लवकरच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी शासन स्तरावर उपाययोजना सुरु आहेत. अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. तसेच शेतकऱ्यांनी खचून न जाता धैर्याने या परिस्थितीचा सामना करावा, राज्य सरकार आपल्या पाठीशी खंबीरपणे उभं आहे.'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्यात पावसाचे थैमान चालू असून गेल्या दोन महिन्यात अतिवृष्टी, पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील तब्बल ३० जिल्ह्यांतील १९५ तालुक्यांमध्ये मोठे नुकसान झाले आहे. या काळात झालेल्या पावसामुळे ६५४ महसूल मंडळांमधील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.सर्वाधिक नुकसान झालेले जिल्हे नांदेड (७२८,०४९ हेक्टर), यवतमाळ (३१८,८६० हेक्टर), वाशीम (२०३,०९८ हेक्टर), धाराशिव (१५७,६१० हेक्टर), अकोला (१७७,४६६ हेक्टर), सोलापूर (४७,२६६ हेक्टर) आणि बुलढाणा (८९,७८२ हेक्टर) आहेत.राज्यातील एकूण १९५ तालुक्यांमध्ये या अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असून ६५४ महसूल मंडळांतील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. बाधित पिके: सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग या पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. काही ठिकाणी भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद या पिकांनाही फटका बसला आहे. कृषीमंत्री भरणे यांनी शेतकऱ्यांना आश्वस्त केले की, राज्य सरकार त्यांच्या पाठीशी उभी आहे आणि त्यांना आर्थिक तसेच तांत्रिक मदत मिळेल. या परिस्थितीत शेतकऱ्यांनी धैर्य गमावू नये, योग्य मार्गदर्शन घेऊन आपली शेती सुधारण्यावर भर द्यावा, अशी अपेक्षा सरकारने व्यक्त केली आहे. ऑगस्ट-सप्टेंबरच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या या मोठ्या नुकसानामुळे शेतकरी आणि राज्यासाठी मोठा आव्हान उभा राहिला आहे. मात्र, योग्य वेळेत नुकसानभरपाई, मदत आणि तांत्रिक मार्गदर्शन मिळाल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक संकट कमी होण्याची शक्यता आहे.



# कांदा रोपांची रोगमुक्त वाढीसाठी नैसर्गिक उपाय



कांदा राज्यातील महत्त्वाचे व आर्थिकदृष्ट्या परिणामकारक पीक मानले जाते. मात्र दरवर्षी बदलत्या हवामानामुळे कांद्याच्या रोपवाटिकेतील समस्यांमध्ये मोठी वाढ झाली आहे. बी उगम कमी होणे, डंपिंग ऑफ सारखे बुरशीजन्य रोग, कीड प्रादुर्भाव अशा अडचणींमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. यावर उपाय म्हणून तज्ज्ञांनी कांदा रोपवाटिकेत जैविक घटकांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

विशेषतः कांद्याची रोपवाटिका तयार करत असताना बियाणे टाकल्यानंतर गांडूळ खत किंवा चांगले कुजलेले शेणखत याचा एक अत्यंत हलका थर वरून देण्याचा सल्ला देण्यात आला आहे. हा थर धूळफेक पेरणी केलेल्या बियांवर दिल्यास, मातीतील ओल टिकते तसेच बी उगमाची प्रक्रिया जलद व सुलभ होते. मात्र केवळ खताचा थर पुरेसा नाही. त्यात ट्रायकोडर्मा विरिडी आणि पीएसबी हे जैविक घटक मिसळल्यास कीड व रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर कमी होतो. ट्रायकोडर्मा हे जमिनीतील हानिकारक बुरशीवर नैसर्गिकरीत्या नियंत्रण ठेवते. त्याचा वापर केल्यास डंपिंग ऑफ, रूट रॉट यांसारख्या बुरशीजन्य आजारांपासून रोपांचे संरक्षण होते. त्याचप्रमाणे पीएसबीचा वापर केल्याने जमिनीत उपलब्ध असलेला अघुलनशील स्फुरद विद्राव्य स्वरूपात रोपांना मिळतो. त्यामुळे मुळे मजबूत होतात आणि रोपांची वाढ अधिक सशक्त होते. हे जैविक घटक शेणखत किंवा गांडूळ खतात मिसळून रोपवाटिकेत वापरल्यास कांद्याच्या आरोग्यदायी रोपांची निर्मिती होऊ शकते. दरम्यान, खताचा थर अतिशय हलका असावा.

जाडसर थर दिल्यास बी अंकुरण्यास अडथळा निर्माण होतो व कधी कधी बी कुजण्याची शक्यताही निर्माण होते. त्यामुळे खताची मात्रा नियंत्रित ठेवणेही तितकेच आवश्यक आहे. कांद्याच्या लागवडीचा पाया रोपवाटिकेतच घातला जातो. त्यामुळे या टप्प्यावर केलेले व्यवस्थापन पुढील उत्पादनावर थेट परिणाम करतं. यासाठी शेतकऱ्यांनी रासायनिक खतांऐवजी अशा जैविक पर्यायांचा अवलंब करणे गरजेचे ठरत आहे.

# शेणापासून लाकूड निर्मितीचा व्यवसाय



शेणखताच्या लाकडाचे महत्त्व आणि उपयोग यासंबंधीची लोकांमध्ये जागरूकता वाढून येत्या काही वर्षांत अनेक पटींनी वाढण्याची शक्यता आहे. परंतु शेणखत टंचाईमुळे ही मागणी पूर्ण करणे हे एक आव्हान आहे. त्यामुळे जे शेतकरी किंवा पशुपालक हा व्यवसाय करू इच्छितात त्यांच्यासाठी हा एक भरभराटीचा आणि चांगला नफा मिळवून देणारा व्यवसाय ठरू शकतो.

शेणखताचे लाकूड मुख्यतः बायोगॅस बनवण्यासाठी किंवा सेंद्रिय खतासाठी वापरण्यात येते हे आपल्याला माहीत आहे. शेण हे सर्व प्रकारे फायदेशीर आहे आणि पर्यावरणाला पोषक आहे. शेणाचा वापर करून बनवलेले लाकूड हवन, अध्यात्मिक यज्ञ, अग्निहोत्र, गृहपाठ, विधी, पूजापाठ आणि इतर धार्मिक कार्यांमध्ये उपयोगी आहे. शेणाचे लाकूड बनवण्याच्या व्यवसायात सुरुवातीला ५० हजार रुपयांपर्यंत गुंतवणूक करावी लागेल. जेणे करून तुम्ही शेणाचे लाकूड बनवण्यासाठी मशीन आणि इतर आवश्यक वस्तू खरेदी करू शकता.

शेणखत लाकूड मशीन : शेणापासून लाकूड बनवण्याच्या मशीनची किंमत भारतीय बाजारपेठेत ४२ हजार ते १ लाख रुपये आहे. या मशीनच्या मदतीने तुम्ही १ किलो वजनाचे लाकूड १५ सेकंदात सहज तयार करू शकता. तुम्हाला मशीनसाठी वेगळे दुकान किंवा फॉर्म खरेदी करण्याची गरज नाही. या नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रदूषणावरही नियंत्रण ठेवता येणार आहे. शेणापासून लाकूड बनविण्याची मशीन तुम्ही सहजपणे ऑनलाईन पोर्टलवर खरेदी करू शकता.व्यवसायासाठी कच्चा माल : या व्यवसायासाठी गायीचे शेण, वाळलेला भुसा, गवत आणि शुद्ध पाणी फक्त या कच्च्या मालाची गरज आहे.व्यवसायासाठी आवश्यक जागा : हा व्यवसाय सुरू करण्यासाठी सुमारे २५०० चौरस फूट क्षेत्रफळाची आवश्यकता असते. याशिवाय, मशीन सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी अंदाजे १००० चौरस फूट क्षेत्र आवश्यक असेल. ज्या भागात मशीन ठेवणार आहात त्यावर छत असणे गरजेचे आहे.

आवश्यक नोंदणी आणि परवाने : या व्यवसायासाठी एमएसएमई नोंदणी करणे गरजेचे आहे. एमएसएमई अंतर्गत तुमचा व्यवसाय नोंदणी केल्यानंतर, तुम्हाला कर्जाची रक्कम सहज मिळू शकते. तुम्ही या कर्जाची रक्कम हा व्यवसाय चालवण्यासाठी लागणारी मशीन खरेदी करण्यासाठी वापरू शकता. शेणाचे लाकूड बनवण्याचा व्यवसाय सुरू करायचा असेल तर तुम्हाला ट्रेड लायसन्स मिळणे आवश्यक आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून एनओसी: हा व्यवसाय सुरु करताना प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून एनओसी मिळवणे गरजेचे आहे.

शेणाचे लाकूड बनवण्याची पद्धती : सर्व प्रथम, ६०:३०:१० च्या प्रमाणात शेण, कोरडा पेंढा आणि कोरडे गवत यांचे मिश्रण तयार करा. हे मिश्रण टाकावे लागेल. लाकूड बनवणारे यंत्र कच्च्या मालाचे मिश्रण लाकडी वडीमध्ये रूपांतरित करते आणि बाहेर फेकते. यंत्रातून बाहेर आलेली लाकडी वडी नाजूक तसेच ओली असते. ही लाकडी वडी कोरडी होण्यासाठी तुम्हाला ती सूर्यप्रकाशाखाली ठेवावी लागेल. मोकळ्या वातावरणात ही लाकडी वडी कोरडी होण्यासाठी सुमारे ५ ते १० दिवस लागतात. सुकल्यानंतर हे शेणखत बाजारात विकण्यासाठी तयार होते.

# प्रतिकूल परिस्थितीतही तग धरणाऱ्या 'कारळा' पिकाची लागवड



खरीपात काही पिकांचे अति पावसामुळे नुकसान होते तर काही पिके तग धरून राहतात. असेच एक पीक म्हणजे कारळा. हे दुर्लक्षित केलेले पण कोकणातील महत्त्वाचे पारंपरिक खरीप तेलबिया पीक आहे. त्यामध्ये ३५ ते ४० टक्के तेल असते. वेगवेगळ्या प्रकारे उपयुक्त असणारे हे कारळ्याचे पीक शेतकऱ्यांनी मात्र पूर्णपणे दुर्लक्षित केले आहे.

कारळ्याचे उपयोग :कारळ्याच्या तेलाचा वापर खाद्यतेल म्हणून केला जातो. याशिवाय या तेलाचा वापर रंग, साबण, यंत्रात लागणारे वंगण आणि सौंदर्य प्रसाधने तयार करण्यासाठी केला जातो. कारळ्याच्या पेंडींचा वापर जनावरांना खाद्यपेंड म्हणून करतात. विशेषतः दुभत्या जनावरांसाठी या पेंडीचा वापर केला जातो. कारण या पेंडीमध्ये ३७ टक्के प्रथिने, २६ टक्के कर्बोदके आणि ४.५८ टक्के खनिजे असतात. तसेच या पेंडीचा वापर सेंद्रिय खत म्हणूनही केला जातो. या पेंडीमध्ये ५ टक्के नत्र, २ टक्के स्फुरद, व १.५ टक्के पालाश असते. कारळा बी स्वादिष्ट चटण्या आणि खमंग मसाल्यामध्ये वापरण्यात येते. बहुपीक पद्धतीमध्ये मधमाशा आकर्षित करणारे व किडींना परावृत्त करणारे पीक आहे.

कारळा पिकाची लागवड : या पिकाची लागवड मुख्यत्वे करून वरकस उताराच्या आणि साधारण प्रतिच्या जमिनीवर घेतली जाते. विशेषतः खरीप हंगामात कोरडवाहू पीक म्हणून या पिकाचा आजवर विचार केला आहे. पीक वाढीसाठी लागणार्या अन्य घटकांचा किंवा सेंद्रिय खतांचा या पिकासाठी वापर केला जात नाही.

हे पीक खूप दाट पेरल्यास खरीप हवामानात उंच वाढते, फांद्या कमी फुटतात. त्यामुळे कारळ्याचे अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. कारळा हे पीक खरीप व रब्बी हंगामात घेता येते. जादा पावसात तग धरते शिवाय पाण्याचा ताणही सहन करते. प्रतिकूल परिस्थितीत पिकाची चांगली वाढ होते. जमिनीतील सर्वसाधारण अन्नद्रव्यांच्या पुरवठ्यामध्येही पीक उत्तम येते. या पिकामध्ये अवर्षण प्रतिकारक शक्ती असल्यामुळे कमीत कमी पाण्यात या पिकाची चांगली वाढ होते. या पिकास रोग, किडींचा विशेष प्रादुर्भाव होत नाही. उग्र वास असल्यास भटक्या गुरांचा त्रास पण कमी होतो.

उत्पन्न व शेत सुशोभिकरण : कारळ्याची पिवळी फुले २० ते २५ दिवस टिकून राहतात. या गुणधर्माचा वापर करून शेतजमीन सुशोभित करण्यासाठी या पिकाची लागवड उत्तम ठरते. तृणधान्ये, भाजीपाला पिकांमध्ये आंतरपीक म्हणून या पिकाची लागवड करणे शक्य आहे. या पिकांच्या भोवती लागवड करावी. पक्ष्यांचा या पिकास बिलकूल त्रास होत नाही. या पिकाची फूलधारणा झाल्यावर आकर्षित होतात. त्यामुळे शेतातील इतर परपरागसिंचित पिकांमध्ये परागीभवन जास्त प्रमाणात होते. पिकाची फुले सुकून बोंडे काळी झाली की, कापणी करावी.




## महत्वाच्या घटना

१५०२ : आपल्या चौथ्या व शेवटच्या सफरीत ख्रिस्तोफर कोलंबस होंडुरास येथे पोचला.
१९१९ : हॉलंडमधे स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला.
१९२४ : गांधीजींनी हिंदू मुस्लीम ऐक्यासाठी २१ दिवसांचे उपोषण सुरू केले.
१९२७ : महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना
१९४७ : अमेरिकन गुप्तचर संघटना सी. आय. ए. ची स्थापना.
१९४७ : अमेरिकन वायू दलाची स्थापना करण्यात आली.
१९४७ : भारतीय राष्ट्रीय सुरक्षा कायदा पास करण्यात आला.
१९४८ : निझामाच्या सैन्याने पराभव स्वीकारल्यामुळे 'ऑपरेशन पोलो' स्थगित करण्यात आले.
१९६० : फिडेल कॅस्ट्रो क्यूबाच्या शिष्टमंडळचे प्रमुख म्हणून संयुक्त राष्ट्रात आले.
१९६२ : बुरुंडी, जमैका, र्?वांडा आणि त्रिनीदाद व टोबॅगो यांचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९६७ : साली भारतातील उत्तरपूर्व राज्य नागालँड ने इंग्रजी भाषेला आपली राजकीय आधिकारिक भाषा म्हणून घोषित केलं.
१९९७ : महाराष्ट्र सरकारने कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाची स्थापना रामटेक नागपुर केली.
१९९९ : साहित्यिक व्यंकटेश माडगूळकर यांना कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा जनस्थान पुरस्कार जाहीर
२००२ : चित्रपट क्षेत्रात अविस्मरणीय कामगिरी केलेले दिग्दर्शक हृषिकेश मुकर्जी यांना राष्ट्रपती के. आर. नारायणन यांच्या हस्ते 'दादासाहेब फाळके पुरस्कार' हा चित्रपट क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.
२००९ : टेलिव्हिजनवर सलग ७२ वर्षे आणि त्याआधी रेडिओवर सलग १५ वर्षे सुरू असलेल्या 'द गायडिंग लाईट' या मालिकेचा शेवटचा भाग प्रसारित करण्यात आला.
२०१४ : स्कॉटलंड युनायटेड किंगडमपासून स्वातंत्र्याच्या विरोधात ५५% ते ४५% मते दिली.
२०१६ : सरकारविरोधी दहशतवाद्यांनी कश्मीरमध्ये १७ भारतीय लष्कराचे जवान ठार मारले.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

५३ : ट्राजान रोमन सम्राट (मृत्यू: ९ ऑगस्ट ११७)
१७०९ : सॅम्युअल जॉन्सन ब्रिटिश साहित्यिक, टीकाकार, पत्रकार व विचारवंत (मृत्यू: १३ डिसेंबर १७८४)
१८८३ : इंग्लंडमध्ये शिकत असतांना ब्रिटीश अधिकारी विलियम कर्झन व्हायली यांची हत्या करणारे थोर भारतीय क्रांतिकारक व स्वातंत्र्य सेनानी शहीद मदन लाल धिंग्रा यांचा जन्मदिन.
१८९५ : जॉन डायफेनबेकर कॅनडा देशाचे १३वे पंतप्रधान (निधन: १६ ऑगस्ट १९७९)
१८९५ : ब्रिटीश कालीन भारतातील नवानगर राज्याचे महाराज व ब्रिटीश संघातील भारतीय कसोटी क्रीकेटपटू महाराजा रणजीत सिंह यांचा जन्मदिन.
१९०० : शिवसागर रामगुलाम मॉरिशस देशाचे पहिले मुख्यमंत्री, पंतप्रधान व गव्हर्नर जनरल (मृत्यू: १५ डिसेंबर १९८५)
१९०५ : ग्रेटा लोविसा गुस्ताव्हसन ऊर्फ 'ग्रेटा गार्बो' हॉलिवूड अभिनेत्री (मृत्यू: १५ एप्रिल १९९०)
१९०६ : प्रभूलाल गर्ग ऊर्फ 'काका हाथरसी' हिन्दी हास्यकवी, पद्मश्री (१९८५). ते विडंबनकाव्यासाठी प्रसिद्ध होते. त्यांची सुमारे दीडशे पुस्तके प्रसिद्ध झाली. 'मेरा जीवन ए वन' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. १९३२ मध्ये त्यांनी भारतीय शास्त्रीय संगीताला वाहिलेले 'संगीत' हे मासिक सुरू केले, ते आजतागायत चालू आहे. (मृत्यू: १८ सप्टेंबर १९९५ हाथरस, उत्तर प्रदेश)
१९१२ : गजानन हरी तथा राजा नेने चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेते व दिग्दर्शक (मृत्यू: २१ फेब्रुवारी १९७५)
१९४५ : मॅक्फि चे संस्थापक जॉन मॅक्फि यांचा जन्म.
१९५० : भारतीय अभिनेते विष्णुवर्धन यांचा जन्म. (मृत्यू: ३० डिसेंबर २००९)
१९५० : पद्मश्री व राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री शबाना आझमी यांचा जन्मदिन.
१९५६ : अनंत गाडगीळ भारतीय राजकारणी, महाराष्ट्राचे आमदार
१९५७ : लॉईड मॉरिसन एच. आर. एल. मॉरिसनचे संस्थापक (निधन: १० फेब्रुवारी २०१२)
१९६८ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि राजकारणी उपेंद्र राव यांचा जन्म.
१९७१ : अमेरिकन सायक्लिस्ट लान्स आर्मस्ट्रॉंग यांचा जन्म.
१९८३ : भारतीय दूरदर्शन मालिका कलाकार सनाया इरानी यांचा जन्मदिन.
१९८९ : अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय बॅडमिंटन खेळाडू अश्विनी पोन्नापा यांचा जन्मदिन.
२००४ : नोदिरबेक अब्दुसत्तोरोव उझबेक बुद्धिबळ ग्रँडमास्टर

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५९ : भारताच्या पहिल्या स्वातंत्र्य उठावातील अग्रगण्य क्रांतिकारी तात्या टोपे यांचे निधन.
१८९९ : बंगाल नवजागृतीचे भारतीय लेखक आणि बौद्धिक राजनारायण बसु यांचे निधन.
१९५८ : भारतरत्न पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय थियोसोफिस्ट आणि सार्वजनिक व्यक्ती भगवान दास यांचे निधन.
१९९२ : मुहम्मद हिदायतुल्लाह भारताचे सहावे उपराष्ट्रपती (२० ऑगस्ट १९७९ २० ऑगस्ट १९८४) आणि ११ वे सरन्यायाधीश (२५ फेब्रुवारी १९६८ १६ डिसेंबर १९७०) (जन्म: १७ डिसेंबर १९०५ लखनौ, उत्तर प्रदेश)
१९९३ : असित सेन विनोदी अभिनेते व दिग्दर्शक, त्यांनी सुमारे ५०० चित्रपटांतून भूमिका केल्या (जन्म:
१९९५ : प्रभूलाल गर्ग ऊर्फ 'काका हाथरसी' हिन्दी हास्यकवी, पद्मश्री (१९८५). ते विडंबनकाव्यासाठी प्रसिद्ध होते.(जन्म: १८ सप्टेंबर १९०६)
१९९९ : अरुण वासुदेव कर्नाटकी मराठी चित्रपट दिग्दर्शक (जन्म:)
२००२ : शिवाजी सावंत साहित्यिक. त्यांची 'मृत्यूंजय' ही कादंबरी इंग्रजी, कन्नड, गुजराती, मल्याळी इ. भाषांमध्ये प्रसिद्ध झाली.(जन्म: ३१ ऑगस्ट १९४०)
२००४ : डॉ. भालचंद्र दिनकर फडके दलित साहित्याचे मर्मग्राही समीक्षक (जन्म: १३ मे १९२५)
२०१३ : भारतीय राजकारणी वेलियाम भरगवण यांचे निधन.

# कामचुकार अधिकाऱ्यांचा खा. डॉ. कल्याण काळे यांनी घेतला समाचार

## बैठकीला गैरहजर अधिकारी कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस ;जिल्ह्यातील विकासाची कामे तात्काळ पार पाडावी

जालना। प्रतिनिधी

सर्वसामान्य जनतेची आडवणूक करणाऱ्या आणि विविध योजनेचे प्रस्ताव प्रलंबीत ठेवणाऱ्या कामचुकार अधिकाऱ्यांचा खा. डॉ. कल्याण काळे यांनी चांगलाच समाचार घेतला असून काम न करणाऱ्या आणि बैठकीला गैरहजर राहणाऱ्या अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देश खा. डॉ. कल्याण काळे यांनी दिलेत. जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (दिशा) चे अध्यक्ष तथा खासदार डॉ. कल्याण काळे यांनी सोमवार दि. १५ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात बैठक घेतली.यावेळी खासदार डॉ. काळे बोलत होते. बैठकीला सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, आमदार नारायण कुचे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नु पी.एम., अपर जिल्हाधिकारी रिता मैवार, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, यांच्यासह अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. दरम्यान जलजीवन मिशन आणि कामगार विभागाच्या अनुषंगाने कोणताच विषय विषयपत्रिकेवर दिसून आला नाही. त्यामुळे खा. डॉ. कल्याण काळे यांनी तो विषय निर्दर्शनास आणून दिला.



शिवाय मागील दिशा समितीच्या बैठकीतील काही विषय देखील प्रोसिडींगला घेतले नसल्याचे खा. काळे यांच्या लक्षात आले. त्यावरुन त्यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची चौकशी लावा : गेल्या काही दिवसापुर्वी झालेल्या दिशा समि. परंतु, चौकशीचा विषयच प्रोसिडींगमधून वगळण्यात आला. त्यामुळे खा. डॉ. कल्याण काळे यांनी संताप व्यक्त करुन पुन्हा तो विषय प्रोसिडींगला घेऊन चौकशी करण्याच्या सुचना केल्या. दरम्यान जालना जिल्ह्यातील काही पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी नवरा, बायको, मुलगा अशा पध्दतीने एकाच घरात अनेक घरकुलाचा लाभ दिल्याचे आढळून आले, त्यावेळी अंबड पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी पदी उदय राजपूत होते, सध्या ते उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत विभाग जिल्हा परिषद म्हणून कामकाज पाहत आहेत. त्यामुळे तत्कालीन गटविकास अधिकाऱ्याची चौकशी करुन अहवाल पुढील बैठकीत ठेवण्याचे निर्देश खा. डॉ. कल्याण काळे यांनी दिले. या बैठकीत काही तक्रारीही झाल्या. कामे न करता बीले उचलण्यात आल्याचे दिशा समितीच्या निर्दर्शनास आणून दिले. त्यावर एक समिती गठीत करुन चौकशी करुन कारवाई करण्याच्या सुचना खा. डॉ. कल्याण काळे यांनी दिल्या. दिशा समितीच्या बैठकीसाठी अनेक अधिकाऱ्यांनी दांडी मारली. त्यामध्ये सर्वच तहसिलदार आणि जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांचा समावेश होता. सदरील विभागाच्या अधिकाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई करण्याच्या सुचना खा. डॉ. कल्याण काळे यांनी दिल्या. त्यावर जालना तहसिलदार वगळता इतर सर्व तहसिलदार आणि जलसंपदा अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बाजवली जाणार आहे.जनतेच्या कामावर विशेष लक्ष देत खा. डॉ. कल्याण काळे यांनी विविध विभागाच्या विविध योजनेतील लाभार्थ्यांच्या प्रलंबीत प्रस्तावचा आणि नाकारलेल्या प्रस्तावाचा आढावा घेतला. त्यात सन २०२२ ते २०२४ पर्यंत जाफराबाद आणि भोकरदन तालुक्यात एकही विहीर का मंजुर करण्यात आली नाही. तसेच अंबड आणि घनसावंगीतील काही योजनेचे प्रस्ताव का नाकारण्यात आले असा सवाल खा. डॉ. कल्याण काळे यांनी उपस्थित केला. त्यावर अधिकाऱ्यांना समर्पक उत्तरे देता आली नाहीत. कोणतेही प्रस्ताव विनाकारण नाकारु नका, जनतेला त्रास देऊ नका, योजनेचा सर्वांना लाभ द्या असे निर्देश खा. डॉ. कल्याण काळे यांनी दिलेत. या बैठकीत जलजीवन मिशन आणि महावितरण विभागाचे कामे रखडल्याचे दिशा समितीच्या लक्षात आले. त्यामुळे कामे न करता बीलं उचलणाऱ्या आणि कामं प्रलंबीत ठेवणाऱ्या एजन्सीवर कारवाई करा, दंडात्मक कारवाईवर देखील काम होत नसेल तर त्यांना काळ्या यादीत टाका असे खा. डॉ. कल्याण काळे आणि आमदार नारायण कुचे यांनी संबंधिक विभागाला सुचविले. दरम्यान लोकहिताची विकास कामे करतांना प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींच्या कुठल्याही दबावाला बळी न पडता जिल्ह्यातील ग्रामीण रस्त्यांच्या कामासह इतरही कामे तातडीने सुरु करुन वेळेत पुर्ण करावीत. ग्रामीण रस्ते हे गावातील गावकरी व शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे रस्ते असून त्यांच्यासाठी ही कामे प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना खासदार डॉ.काळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतील कामामध्ये बराच कालावधी उलटल्यानंतरही कोणतीच प्रगती झाली नसून, या कामांमध्ये होत असलेल्या दिरंगाईबद्दल खासदार डॉ.काळे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांबाबत नाराजी व्यक्त केली. तसेच या योजनेतंर्गत काही गावात झालेल्या कामांची गुणवत्ता तपासणी करण्यात यावी, असे आदेशही त्यांनी दिले. प्रधानमंत्री आवास योजनेतील शहरातील व ग्रामीण भागातील दिल्या जाणाऱ्या अनुदानाच्या फरकाबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत स्वयं सहायता गट स्थापन झालेल्या बचतगटांना बँकांकडून निधी मिळण्यास येणाऱ्या अडचणी दूर कराव्यात. अशी सुचनाही खासदार डॉ.काळे यांनी केली.

---

# ओला दुष्काळ जाहिर करुन शेतकऱ्यांना सरसकट मदत करा

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्ह्यासह अंबड व घनसावंगी तालुक्यातील सर्वच महसूल मंडळात अतिवृष्टी झालेली असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे.माजी मंत्री राजेश टोपे यांनी घनसावंगी तालुक्यातील शिंदेवडगाव,पानेवाडी व अंबड तालुक्यातील सुखापुरी येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतपिकांच्या नुकसानीची पाहणी केली. शेतपिक व फळबागांचे नुकसान मोठ्या प्रमाणावर मुसळधार पाऊस व अतिवृष्टी झाल्याने शेतामध्ये उभी असलेली कापूस, तूर, सोयाबीन, मुग, उडीद या खरीप पिकांमध्ये गुडघ्याइतके पाणी साचल्याने संपूर्णपणे नुकसान झालेले आहे. तसेच पालेभाज्यासह सर्व फळबागांचे व ऊसाचे सुध्दा मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे. शेतजमीन खरडून जाणे अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे तसेच कांही ठिकाणी पाझर तलाव फुटल्याने जिल्हयामध्ये अनेक ठिकाणी शेतक-यांच्या जमीनी खरडून व वाहून गेलेल्या आहेत. शेती-शेतपिक व फळबागांचे पंचनामे करुन सरसकट नुकसान भरपाई मिळणे अतिवृष्टी व सततचा पाऊस झाल्यामुळे शेतीसह खरीपातील कापुस, सोयाबीन, मुग, उडीद व तुर इत्यादी पिकासंह फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. सदरील झालेल्या नुकसानीचे तातडीने गट-गांव निहाय सरसकट पंचनामे करुन बाधित शेतक-यांना तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी.

घरांची पडझड अतिवृष्टी व सततचा पावसामुळे काही गांवामध्ये घरात पाणी शिरलेले आहे तसेच घरांची पडझड झालेली आहे त्यामुळे मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. स्थलांतरीत कुटूंबांना आर्थिक मदत करणे नदी व नाल्याच्या बाजूस असलेल्या अनेक घरांमध्ये पाणी शिरल्यामुळे त्यांची राहण्याची गैरसोयी निर्माण झालेले आहे, अशा कुटूंबाचे तात्पुरते स्थलांतर करुन त्यांना शासन निकषानुसार तात्काळ मदत देण्यात यावी. वैयक्तीक नुकसान नदी व नाल्याच्या बाजूस असलेल्या अनेक घरांमध्ये पाणी शिरून गृहोपयोगी वस्तू व अन्नधान्याचे नुकसान झालेले आहे. तसेच अनेक गांवात घरांची पडझड झालेली आहे. शासनाचे स्थायी आदेशाप्रमाणे अशा बाधीत कुटूंबाना तात्काळ मदत देण्यात यावी. तसेच अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचे असलेले पशुधन गाय, बैल, म्हैस, शेळी, कोंबड्या इत्यादी पशुधन विज पडून तसेच पाण्यात वाहुन गेले व मृत्युमुखी पडलेले आहेत. तातडीने याचे पंचनामे करुन आर्थिक मदत देण्यात यावी. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी दळण-वळण पुर्णपणे ठप्प झालेले आहे. यामुळे कांही गांवाचा संपर्क तुटला, शालेय विद्यार्थी,



रुग्ण, वयोवृध्द नागरिक यांची मोठ्याप्रमाणावर गैरसोय झालेली आहे. त्यामुळे तात्काळ रस्ते व पुलांची दुरुस्ती करुन जनजीवन सुरळीत करावे. शाळा खोल्या, वॉल कंपाऊंड, स्मशानभूमी वॉलकंपाऊंडची मोठ्या प्रमाणावर पडझड झालेली आहे, ते सुध्दा तातडीने दुरुस्त करणे गरजेचे आहे. रस्ते व पुल दुरुस्तीसाठी प्रस्ताव तयार करुन मधून निधी मंजुर करुन तातडीने रस्ते व पुलांची दुरुस्ती करण्यात यावी. तसेच पाझर तलावाचे नुकसान झालेले आहे त्याची तातडीने दुरुस्ती करावी. पिक विमा खरीप पिकांचे व फळबागेची अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे. त्यामुळे पिंकविमा कंपनीला तातडीने सूचना करुन सरसकट पिकविम्याची रक्कम मंजुर करणे बाबत कळवून शेतकरी हीताचे अवलंबविण्यात यावे. अनेक ठिकाणी ट्रान्सफार्मर, ११ केव्ही लाईन तसेच एलटी लाईन, पोल पडलेले असल्यामुळे त्या भागातील विज पुरवठा बंद आहे. त्यामुळे लोकांना शेतीची लाईट, गांवातील लाईट बंद झाल्याने गैरसोय निर्माण झाली आहे. तातडीने या सर्व गोष्टी दुरुस्त करुन विज पुरवठा पूर्ववत सुरळीत करण्यात यावा. संपूर्ण तालुक्यामध्ये अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास अस्मानी संकटाने हिरावून घेतलेला आहे. शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून तो मोठ्या आर्थिक विवंचनेत सापडला आहे. अंबड व घनसावंगी तालुक्यातील तहसीलदार यांना निवेदन देऊन ओला दुष्काळ जाहीर करुन त्याअनुषंगाने विजबील वसूली, कर्ज वसूली करु नये, शैक्षणिक शुल्क माफ करावे. अशा व या अनुषंगाने दुष्काळाच्या सर्व सवलती लागू करण्यात याव्यात. झालेल्या सर्व नूकसानीचे सरसकट पंचनामे तातडीने करण्यात यावेत. शासन निर्णयाप्रमाणे तात्काळ जिरायती, बागायती फळबागांसाठी नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी माजी मंत्री राजेश टोपे यांनी केली आहे.

---

# अर्चना कुटे सीआयडीच्या ताब्यात: ज्ञानराधा घोटाळ्यात महत्त्वाची प्रगती

## आ.लोणीकर यांच्या पत्रामुळे अर्चना कुटेवर कारवाई

जालना। प्रतिनिधी

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड घोटाळ्याच्या तपासात मोठी प्रगती झाली आहे. कुटे ग्रुपच्या संचालक अर्चना कुटे यांना पुण्यातून सीआयडीच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. हजारो कोटींच्या या भ्रष्टाचार प्रकरणात त्या फरार होत्या. छत्रपती संभाजीनगरच्या सीआयडी पथकाने पुण्यातून त्यांना ताब्यात घेऊन छत्रपती संभाजीनगर येथे आणण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. ज्ञानराधा मल्टीस्टेटने बीड, जालना, परभणी, छत्रपती संभाजीनगर, पुणे, नांदेड, लातूर, हिंगोली आदी जिल्ह्यांमध्ये ५० हून अधिक शाखांद्वारे १२% ते १८% व्याजदराचे आमिष दाखवून लाखो गुंतवणूकदारांची फसवणूक केली.

या पॉन्झी स्कीममुळे २,३१८ ते ३,५०० कोटींची फसवणूक झाली, ज्यामुळे ४ लाखांहून अधिक गुंतवणूकदार प्रभावित झाले. अनेकांनी जीवनभराची कमाई गमावली, तर काहींनी आर्थिक तणावामुळे आत्महत्या केल्या. या प्रकरणात सूरेश कुटे आणि कुलकर्णी यांच्या अटकेनंतर अर्चना कुटे यांना अटक करण्याची मागणी जोर धरत होती. सीआयडीने एप्रिल २०२५ मध्ये तपास हाती घेतल्यानंतर ४०० कोटींच्या २३० मालमत्ता शोधल्या, त्यापैकी ८० जप्त केल्या. अखेर १६ सप्टेंबर २०२५ रोजी अर्चना कुटे यांना पुण्यातून ताब्यात घेण्यात यश आले. परतूरचे आमदार बबनराव लोणीकर यांनी या घोटाळ्याविरुद्ध सातत्यपूर्ण प्रयत्न केले. डिसेंबर २०२३ च्या नागपूर अधिवेशनात त्यांनी हा मुद्दा उपस्थित करून मोक्का कायद्यांतर्गत कारवाईची मागणी केली. १३ सप्टेंबर २०२५ रोजी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून तीन मागण्या केल्या: जप्त मालमत्तांची विक्री करून पीडितांना तातडीने पैसे परत देण्यासाठी विशेष समिती स्थापन करणे, सूरेश कुटे, अर्चना कुटे आणि संचालकांवर राष्ट्रीय सुरक्षा कायदा () अंतर्गत गुन्हे दाखल करणे, आणि ईडी व सीआयडीच्या तपासाला आणखी गती देणे. आमदार बबनराव लोणीकर यांच्या आक्रमक पाठपुराव्यामुळे तपास यंत्रणांना गती मिळाली, आणि अर्चना कुटे यांच्या अटकेमुळे पीडित गुंतवणूकदारांना दिलासा मिळाला आहे. जुलै २०२५ मध्ये फडणवीस यांनी बीड येथे घेतलेल्या बैठकीत तपास वेगवान करण्याचे आश्वासन दिले होते. एन्फोर्समेंट डिरेक्टोरेटने अंतर्गत तपास करताना १,६२१.८९ कोटींच्या मालमत्ता जप्त केल्या, ज्यात १०० एकर जमीन, बंगले, वाहने आणि बँक खाती समाविष्ट आहेत. सूरेश कुटे यांना जानेवारी २०२५ मध्ये अटक झाली, आणि मार्च २०२५ मध्ये मुंबई कोर्टात २,४६७ कोटींच्या फसवणुकीचा चार्जशीट दाखल झाला, ज्यात २४ आरोपींचा उल्लेख आहे. सीआयडीने ९० संशयित उघडकीस आणले, आणि अर्चना कुटे यांच्या अटकेमुळे तपासाला नवीन दिशा मिळाली आहे. जप्त मालमत्तांची विक्री आणि पीडितांना पैसे परत देण्याची प्रक्रिया लवकरच सुरू होण्याची अपेक्षा आहे. अर्चना कुटे यांच्या अटकेमुळे गुंतवणूकदारांमध्ये आशा निर्माण झाली आहे. लोणीकर यांच्या पत्राने आणि त्यांच्या मागण्यांमुळे सरकारवर दबाव वाढला आहे. पीडित संघटनांनी या कारवाईचे स्वागत केले असून, अंतर्गत कारवाईमुळे भविष्यात अशा घोटाळ्यांना आळा बसेल, अशी आशा व्यक्त केली आहे. या प्रकरणात पुढील प्रगती आणि मालमत्ता विक्रीच्या प्रक्रियेकडे सर्वांचे लक्ष आहे.

---

# कामगारांची वेतन वाढ करून फरकाची रक्कम देण्याची मागणी

जालना

कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखान्यातील कामगारांची वेतन वाढ करुन फरकाची थकित रक्कम देण्याची मागणी अंबड-घनसावंगी उस उत्पादक कामगार संघर्ष समितीची मागणी कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखान्यामधील कामगारांची पगार वाढ व्यवस्थापन देत नाही. या संबंधी मा. प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांना मराठवाडा मुक्ती दिनाच्या (१७ सप्टेंबर २०२५) रोजी समिती सदस्यांनी भेट घेऊन निवेदन दिले.साखर कारखाना मालक / चेअरमन प्रतिनिधी / साखर कामगार संघटना / राज्य सरकार प्रतिनिधी यांच्या त्रिपक्षीय समितीच्या झालेल्या बैठकीमध्ये निर्णय झाला ज्यामध्ये कामगारांना वेतन वाढीचा फायदा २६०० ते २८०० एवढा प्रत्येकाला मिळणार आहे. कामगारांची वेतनवाढ आणि सेवाशर्तीच्या अनुषंगाने राज्य शासनाने त्रिपक्षीय समितीची स्थापना केली होती. राज्यातील साखर कामगार वेतनवाढ आणि अन्य मागण्यांची या पुर्वीची मुदत ३१ मार्च २०२४ रोजी संपली होती, नविन करारानुसार शासनाने त्रिपक्षीय समिती स्थापना केली. त्यानुसार १ एप्रिल २०२४ पासुन कुंशल-अकुशल व तांत्रिक कामगारांना १० टक्के वेतनवाढ देऊन ती लागु करण्याचे ठरले.अंबड-घनसावंगी तालुका कार्यक्षेत्रातील समर्थ / साखर सहकारी साखर कारखाना हा याच भागातील असलेल्या कामगारांवर सातत्याने अन्याय करत असतो. या ठिकाणी कामगार कायद्यांची अंमलबजावणी होत नाही. कामगार कलयाण बोर्ड लागु नाही, ज्यामुळे शासनाच्या नियमानुसार त्यांना सुविधा मिळत नाहीत.अंबड-घनसावंगी संघर्ष समिती ही कामगारांच्या हक्कासाठी शासनाच्या माध्यमातुन भविष्यामध्ये हक्कासाठी शासनाच्या माध्यमातुन भविष्यामध्ये व्यवस्थापना सोबत संघर्ष करणार आहे.

---

# जालन्यात शेतकऱ्याच्या बांधावर जावून पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी केली नुकसानीची पाहणी

## नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याचे दिले प्रशासनाला आदेश



जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील मात्रेवाडी गाव परिसरात शेतकऱ्याच्या बांधावर प्रत्यक्ष जावून पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी शेती पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. पावसामुळे उभी पिके जमिनदोस्त झाली असल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. बदनापूर तालुक्यातील मात्रेवाडी येथील शेतकरी जनार्धन मात्रे यांच्याशी संवाद साधत झालेल्या पिक नुकसानीची माहिती जाणून घेतली. शासन नुकसानग्रस्ताच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून काळजी करु नका अशा शब्दांत बाधित शेतकऱ्यांना धीर दिला. यावेळी त्यांनी तुर, कापुस व सोयाबीन या पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच या सर्व नुकसानीचे पंचनामे तातडीने करुन शेतकऱ्यांना मदत देण्याचे आदेश संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना दिले. तसेच अतिवृष्टीने बाधित पिकाने अतोनात नुकसान झाले असून शासन शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत करणार असल्याचे मत पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केले. या प्रसंगी आमदार नारायण कुचे, भाऊसाहेब घुगे, उपविभागीय अधिकारी रामदास दौंड, नायब तहसीलदार श्री. राजमाने यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

मराठवाडा मुक्तिसंग्राम वर्धापन दिनानिमित्त जालना शहरातील टाऊन हॉल येथील मुख्य शासकीय ध्वजारोहण झाल्यानंतर पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी जालना शहरातील महापालिकेसमोरील परिसरातील शिवशक्ती ग्रीन सिटीत अतिवृष्टीने सखल भागात पावसाचे पाणी साचलेल्या भागातील रहिवासी भेट घेवून विचारपूस केली तसेच रेल्वे स्थानकाशेजारील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर येथील घरामध्ये पाणी साचलेल्या भागाची पाहणी केली. अतिवृष्टीने घरांचे खुप मोठे नुकसान होवून घरात पाणी शिरले आहे. या संकटात सापडलेल्या रहिवाशांना अन्न व इतर आवश्यक बाबी पुरविण्याबाबत जिल्हा प्रशासनाला नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना यावेळी दिल्या. यावेळी आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

---

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज, जि. बीड**

एम ए जी विभाग

E-Mail ID: kaijtahsildarar@gmail.com

दुरध्वनी क्र.०२२४५-२५२६४५

क्र.२०२५/एमएजी/कावि/१०१

दिनांक:-२३.०६.२०२५

**जाहीरनामा**

सर्व जनता मौजे सासुरा ता. केज यांना जाहीर केले जाते की, सासुरा येथील मृत्यु पावलेला इसम नामे शिवदास लिंबराज उगले याचा मृत्यु दिनांक:- ०६.०७.२०१६ रोजी मौजे सासुरा येथे झालेला असुन व मृत्यु नोंद आदेश ग्राम पंचायत सासुरा यांना देणे बाबत त्यांचा भाऊ नामे रोहिदास लिंबराज उगले रा. सासुरा ता. केज यांनी या कार्यालयास दि. २६.०५.२०२५ रोजी अर्ज सादर करुन सोबत ग्राम पंचायत सासुरा यांचे मृत्यु नोंद नसल्याचे प्रमाण पत्र, नोटरी करुन शपथपत्र सादर करुन ग्रामपंचायत सासुरा ता. केज यांना त्यांच्या भावाचा मृत्यु नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे.

२/- शिवदास लिंबराज उगले याचा मृत्यु नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व ग्राम पंचायत कार्यालय सासुरा ता. केज यांना मृत्यु नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत

कार्यकारी दंडाधिकारी, केज

---

# ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट अनुदान द्या-राजेश टोपे

अंबड। प्रतिनिधी

१६ सप्टेंबर २०२५ रोजी माजी मंत्री राजेश भैय्या टोपे यांनी अतिवृष्टी झालेल्या भागात भेटी देऊन नुकसान झालेल्या पिकांची पाहणी केली अंबड, घनसावंगी तालुके व संपूर्ण जालना जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पाऊस पडून मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झालेले आहे. सध्या ऊस, कापूस, सोयाबीन, मोसंबी,तूर इत्यादी पिके पाण्यात गेलेली आहेत. शासनाने तात्काळ या भागाचे सरसकट पंचनामे करून ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी निवेदनाद्वारे माजी मंत्री राजेश भैय्या टोपे यांनी केली आहे.याबाबत अंबडचे तहसीलदार श्री विजय चव्हाण यांना निवेदन देण्यात आलेले आहे.

सध्या सततच्या पडणाऱ्या पावसाने फळ पिकांचे नुकसान झालेले आहे. सध्या सर्व पिके पाण्यात आहेत. त्यामुळे मोसंबी गळ व कपाशी, तूर, सोयाबीन इत्यादी पिके पिवळे पडू लागले आहेत तसेच मोठ्या प्रमाणात नदीच्या व ओढ्या शेजारील शेतजमीनी खरडून गेलेल्या आहेत. काही ठिकाणी घरांची पडझड झालेली आहे तर काही गावात पाणी शिरलेले असून काही कुटुंबांना त्वरित स्थलांतरित करून आर्थिक मदत केली पाहिजे. विजेचे पडलेले पोल त्वरित उभा करून वीज पूर्ववत करावी अशा अनेक मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आलेल्या आहेत. यावेळी सतीश होंडे, विष्णूकुमार शेळके, शिवप्रसाद चांगले, अर्जुन भोजने, नंदकिशोर मुळे, सुनील पिठोरे,संभाजी देशमुख, संतोष सोमाणी, सलीम बागवान, बाळासाहेब दखणे, रोहन चौधरी,अनिरुद्ध उबाळे, मदनराव पावशे, डॉ. ढेंबरे सुधाकर हुलमुख,गौतम ढवळे, सुनील बिडे, नरेंद्र वाघुंडे, बाबासाहेब गायकवाड, जितेंद्र बुरले, विक्रम राजपूत, गोपी घायाळ, सुरज गुडे, बाळू सोळंके, भारत सुबुगडे, शिवाजी गव्हाणे, राजू डोंगरे, अंकुश झाडे इत्यादी कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कार्डियाक कॅथलॅबमुळे गोरगरिबांना आरोग्याच्या सेवा अधिक दर्जेदारपणे मिळतील-उपमुख्यमंत्री अजित पवार

**बीड । प्रतिनिधी**

**शहरी व ग्रामीण भागातील जनतेला पायाभूत सुविधांबरोबरच आरोग्याच्या सेवा अधिक चांगल्या पद्धतीने देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. जिल्हा रुग्णालयातील कार्डियाक कॅथलॅबमुळे गोरगरीब रुग्णांना आरोग्याच्या सेवा अधिक दर्जेदारपणे उपलब्ध होणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी केले.कॅथलॅबसाठी आवश्यकता भासल्यास अधिकचा निधी मंजूर करू,अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.**

बीड येथील जिल्हा रुग्णालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते १८ कोटी ७२ लक्ष रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक कार्डियाक कॅथलॅबचे लोकार्पण श्री. पवार यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार विक्रम काळे, आमदार संदीप क्षीरसागर,डॉ.योगेश क्षीरसागर,उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख,जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन,जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत,आरोग्य सेवेच्या उपसंचालक डॉ.रेखा गायकवाड,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.संजय राऊत आदीची प्रमुख उपस्थिती होती. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या उपस्थित सर्वांना शुभेच्छा देत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, राज्यातल्या प्रत्येक नागरिकाला आरोग्याच्या सेवा अधिक चांगल्या मिळाव्यात यासाठी आरोग्य सेवेचे सक्षमीकरण करण्यावर अधिक भर देण्यात येत आहे.प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याचा शासनाने निर्णय




घेतला आहे. प्रत्येक ठिकाणी नर्सिंग कॉलेज बरोबरच पॅरामेडिकल स्टाफ,नर्सेस,वैद्यकीय अधिकारीही उपलब्ध करून देण्यात येत आहे.अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय हे आशिया खंडातील पहिले महाविद्यालय असून या महाविद्यालयाच्या अद्यावतीकरणसाठी मुख्य आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले आहे.या कामासाठी ११०० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे.त्याचबरोबर बीड येथील जिल्हा रुग्णालयात नर्सिंग महाविद्यालयासाठी इमारत,मुलींच्या वस्तीगृहासाठीही पोलीस विभागाच्या जागेची पाहणी करण्यात आली असून यासाठी १ हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. जिल्ह्यातील जनतेच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या असलेल्या या आरोग्य सुविधांची कामे येत्या काळात पूर्ण करण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करण्यात येतील,यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नसल्याची ग्वाही देखील उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी यावेळी दिली. श्री.पवार पुढे म्हणाले की,जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला देण्यात आले असल्याचे सांगत अहिल्यानगर-बीड या रेल्वेचा शुभारंभ आज करण्यात येत आहे.या प्रवासासाठी लागणारा वेळ कमी करण्यासाठी ही रेल्वे विद्युत व्यवस्थेवर चालवण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.भविष्यात ही सेवा पुणे आणि मुंबईपर्यंत घेऊन जात वाहतूक सेवा अधिक दर्जेदार करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील,यासाठी सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त करत क्रीडा संकुलात खेळाडू,नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी २५ कोटी रुपयांचा निधी


पान २ वर

## बीड तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान

### वंचितचे तालुकाध्यक्ष किरण वाघमारे यांचे बीड तहसीलदार यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे तसेच पडझड झालेल्या घरांचे पंचनामे करून त्यांना तातडीने मदत देण्यात यावी. अशा मागणीचे निवेदन बीड तहसीलदार यांना मंगळवार (दि.१६) सप्टेंबर रोजी वंचित बहुजन आघाडीचे बीड तालुकाध्यक्ष किरण वाघमारे यांच्या नेतृत्वात देण्यात आले



आहे.बीड तहसीलदार यांना निवेदन दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,नद्या-नाले ओसंडून वाहू लागल्याने पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून,शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

त्यामुळे बजरी, कपाशी, सोयाबीन तसेच फळवर्गीय पिके उध्वस्त झाली आहेत.अनेक शेतजमिनी वाहून गेल्या असून नदीकाठच्या गावांतील घरांची पडझड झाल्याने शेतकरी आणि नागरिक दोघेही हवालदिल झाले आहेत. शेतकऱ्यांच्या उरलेल्या आशादेखील पाण्यात वाहून गेल्याने प्रशासनाने तातडीने पंचनामे करून थेट नुकसानभरपाई द्यावी, तसेच सरसकट पिक विमा शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात पान २ वर

## आई-वडील हेच खरे दैवत -कवी अनंत राऊत

माजलगाव । प्रतिनिधी

जगात एकच देव आहे,तो देव प्रत्येकाच्या घरात आहे ते दैवत म्हणजे आपले आई वडील होय.असे प्रतिपादन करून प्रसिद्ध कवी अनंत राऊत यांनी केले.ते म्हणाले की सुंदरराव सोळंके यांनी अनेकांना नोकरीच्या संधी देऊन गरजवंताच्या आयुष्यात सुख समाधान दिले. त्यामुळे सुंदरराव सोळंके देवदूतच होते.

माजी उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांच्या जयंती निमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयात तीन दिवशीय व्याख्यानमालाचे




सुंदरराव सोळंके व्याख्यानमालचे पाहिले पुष्प

आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार प्रकाश सोळंके होते. प्रमुख व्याख्याते प्रसिद्ध कवी मित्र वनव्या मध्ये गारव्या सारखा फेम अनंत राऊत होते.यावेळी विजयकुमार सोळंके, सत्यप्रकाश रुद्रवार, अण्णासाहेब वगरे,प्राचार्य डॉ. जी.के.सानप, प्रभारी प्राचार्य डॉ एन के मुळे, समन्वयक प्रा.डॉ.भाऊसाहेब राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती .

व्याख्यानमालेची पहिले पुष्प गुंफतांना प्रसिद्ध कवी अनंत राऊत म्हणाले की, माणसाने जाती जातीतील दुरावा कमी करून माणुसकी हीच जात हे लक्षात घेतले पाहिजे.स्त्री ही पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे. मातृत्वाने ओतप्रोत भरलेले पात्र म्हणजेच आई. आई जेवढी श्रेष्ठ तेवढाच बाप ही श्रेष्ठ असतो.तो जीवनाचा आधार व मार्गदर्शक असतो. असे सांगून यावेळी त्यांनी मैत्रीचे महत्त्व सांगून मित्र वनव्यामध्ये गारव्यासारखा ही कविता सादर केली. पान २ वर

## वाळू वाहतूक करणारे दोन वाहने चकलांबा पोलिसांच्या ताब्यात, २८ लाखांचा मुद्देमाल जप्त

चकलांबा । प्रतिनिधी

येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीत रात्रग्रस्त करताना राक्षभुवन येथून दोन वाहनाद्वारे वाळूची चोरटी वाहतूक सुरु असल्याची माहिती मिळताच सपोनि संदीप पाटील व त्यांच्या टीमने सापळा रचून दोन्ही वाहने ताब्यात घेतली आहेत.या कारवाईत २८ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांच्या आदेशानुसार अवैध धंद्यांवर कारवाया सुरु असून मध्यरात्री राक्षभुवन येथून दोन वाहनाद्वारे वाळूची तस्करी



करण्यात येणार असल्याची माहिती सपोनि संदीप पाटील यांना मिळाली होती.त्यानुसार राक्षसभुवनच्या रस्त्याचे बाजूला शेतात अंधारात पोलिसांनी दबा धरून बसत वाळू वाहतूक करणारे दोन्ही वाहने एकापाठोपाठ ताब्यात घेतले.या कारवाईत २८ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात पान २ वर

## वाहतूक पोलिस कर्मचारी श्रीकांत राठोड यांचे निधन

परळी । प्रतिनिधी

परळी शहर पोलीस ठाण्यात वाहतूक शाखेत कार्यरत असणारे पोलीस कर्मचारी श्रीकांत छोटूराम राठोड यांचे रक्ताच्या कर्करोगाने दुःखद निधन झाले. दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ८ वा. छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात त्यांची प्राणज्योत मालवली. मृत्यू समयी त्यांचे वय ३८ वर्षे होते. अतिशय तरुण वयात राठोड यांचा मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. अतिशय मनमिळाऊ स्वभाव, हरहुन्नरी व्यक्तिमत्व



असलेले श्रीकांत राठोड यांच्या निधनाने सर्वत्र शोककळा पसरली आहे.

श्रीकांत छोटूराम राठोड हे बीड तालुक्यातील अंतरवन पिंपरीतांडा येथील रहिवासी होते. गेल्या दोन वर्षांपासून परळी शहर पोलीस वाहतूक शाखेत ते कार्यरत होते. गेल्या पान २ वर

## थेरला शिवारात दरोडा,मिसाळ कुटुंबावर चोरट्यांचा जीवघेणा हल्ला

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील थेरला शिवारात सोमवारी मध्यरात्री चोरट्यांनी धाड टाकून भीमराव मिसाळ व त्यांची पत्नी सत्यभामा भीमराव मिसाळ यांच्या घरावर दरोडा टाकला. यावेळी चोरट्यांनी घरातील सदस्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करत लोखंडी रॉडसह जबर मारहाण केली. या घटनेत भीमराव मिसाळ गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.चोरट्यांनी घरातील रोकड, दागिने लंपास केले असल्याचे प्राथमिक माहितीवरून समोर आले आहे. मध्यरात्री झालेल्या या धाडसी दरोड्यामुळे थेरला शिवार आणि परिसरात मोठी खळबळ उडाली





आहे. ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून नागरिकांनी पोलीस प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.या हल्ल्यामुळे गावकऱ्यांमध्ये तीव्र संताप असून परिसरातील सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## गणेश खाडे फौजी यांनी वाचवला कुत्र्याच्या तावडीतून हरणाचा जीव

पाटोदा । प्रतिनिधी



पाटोदा हून करंजवण ला जात असताना गणेश खाडे फौजी यांनी चार-पाच कुत्र्याच्या तावडीतून हरणाचा वाचवला जीव कुत्र्यांनी चावा घेतल्यामुळे हरण व्याकूळ होऊन रस्त्याच्या कडेला पडले होते गणेश खाडे बाबासाहेब नागरगोजे तानाजी खाडे विशाल खाडे अमोल सानप सुमित सानप केशव खाडे यांना दिसताच यांनी कुत्रे हुसकावून लावून वनविभागीय अधिकाऱ्यांना व डॉक्टरांना बोलून त्या हरणाचा वन्य प्राण्याचा जीव वाचवला त्यामुळे त्यांचे गावात सर्वत्र कौतुक होत आहे.

## परळी रेल्वे स्टेशनला आरोमा सींग ठाकुर यांची भेट

### प्रत्यक्ष पहाणी करत पत्रकारांशी साधला संवाद

परळी । प्रतिनिधि

परळी रेल्वे स्टेशन येथे सिकंदराबाद डिव्हिजन दक्षिण मध्ये रेल्वे आरपीएफ च्या आय जी अरोमा सिंग ठाकूर यांनी परळी रेल्वे स्थानक येथील आरपीएफ कार्यालयाला भेट दिली या भेटीत त्यांनी परळी येथील रेल्वे संरक्षण दलाच्या अधिकाऱ्यांशी आणि जवानांशी भेटून परळी रेल्वे स्थानक बद्दल माहिती घेतली नंतर पत्रकारांशी बोलताना अरोमा सिंग ठाकूर म्हणाल्या की परळी रेल्वे स्थानक हे दक्षिण मध्य रेल्वेतील



एक मोठा रेल्वे स्थानक आहे या रेल्वे स्थानकावर प्रवाशांची आवक जावक जास्त आहे आणि या स्थानावर एकूण रेल्वे संरक्षण दलाच्या २१ जवानांची संख्या आहे संख्या कशी वाढवता येईल यावर आम्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांची बोलून चर्चा करेल नुकतीच परळी रेल्वे स्थानकवर ३१ ऑगस्ट रोजी एका सहा वर्षीय चिमुकडीवर बलात्काराची धक्कादायक घटना घडली होती त्या घटनेच्या मॅडमने पहिल्यांदा निषेध केला नंतर आम्ही भविष्यात रेल्वे स्थानक वर सुरक्षा वाढू असा आश्वासन दिला आणि भविष्यात असे घटना नाही घडेल हे पण सांगितले नंतर मॅडमनी स्टेशनची पाहणी केली आणि सुरक्षा विषयी काय उपक्रम राबता येईल हे बघितले.

टोटल परळी रेल्वे स्टेशन मध्ये नवीन स्टेशन इमारत पूर्ण झाल्यावर ३६ कॅमेरे लावण्यात येणार आहेत व विशेष या कॅमेरा मध्ये रेकॉर्ड वरचे गुन्हेगार यांनी स्टेशन परिसर व स्टेशनमध्ये आल्यास या कॅमेऱ्या द्वारे त्यांचे गुन्हेगार असल्याचे पान २ वर

## पालकमंत्र्यांनी आष्टी, शिरूर तालुक्यातील अतिवृष्टीची पाहणी करावी -प्रदिप थोरवे

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील आष्टी आणि शिरूर तालुक्यातील काही परिसरात गेली दोन दिवसांपासून (दिनांक १४/०९/२०२५ पासून)संततधार व मोठ्या प्रमाणात ढगफुटीसह अतिवृष्टीजन्य पाऊस झाला आहे. यामुळे



ओढे-नाले-नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. यामध्ये अनेक नागरिकांना हॅलिकॉप्टर ने पाण्याच्या बाहेर काढण्यात आले आहे. या महापुरामुळे गावतील घरे, नदीलगतची दुकाने, जलसिंचन विहिरी तसेच मोठ्या प्रमाणात शेतीचे प्रचंड नुकसान झाले असून शेतजमिनी खरडून गेल्या आहेत. अनेक रस्ते वाहून गेले आहेत, पूल वाहून गेले आहेत. लाईटची समस्या निर्माण झाली आहे. तरी पालकमंत्री या नात्याने अजित दादा पवार यांनी प्रत्यक्ष पाहणी करून या भीषण परिस्थितीत शेतकऱ्यांना, छोट्या मोठ्या व्यावसायिकाना भरीव मदत करावी अशी विनंती आप चे प्रदेश संघटन मंत्री प्रदिप थोरवे यांनी अजित दादा याना पत्र पाठून केली आहे.

## चिखल तुडवत तहसीलदार घोळवे करतात नुकसानग्रस्त शिवाराची पाहणी

**शिरूर । शंकर भालेकर**

बीड जिल्ह्यामध्ये गेल्या चार-पाच दिवसांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यांमध्ये पुन्हा एकदा पाणी आले आहे. शेतकऱ्यांची ही व्यथा जाणून घेण्यासाठी शिरूर चे तहसीलदार सुरेश घोळवे हे चिखल तुडवत नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावरवरती जाऊन नुकसानीची पाहणी करत आहेत. तालुक्यातील तिंतरवणी महसूल मंडळामध्ये त्यांनी बुधवारी दिवस भर दौरा



करून शेतकऱ्यांच्या नुकसानीची वस्तुनिष्ठता जाणून घेऊन प्रशासनातील कर्मचाऱ्यांना शेतकऱ्याच्या नुकसानीचे तात्काळ पारदर्शक पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. बीड जिल्ह्यामध्ये गेल्या चार-पाच दिवसापासून वरुणराजा सक्रिय झाला असून, त्याचा अनेक ठिकाणी प्रकोपही दिसून आला आहे. या प्रकोपाचा मोठा फटका शिरूर कासार तालुक्यातील शेतकऱ्यांना बसला आहे. शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास वरूनराजाने शेतकऱ्यांची कुचेष्टा करत हिनवून घेतला आहे. मोठ्या कष्टाने पिकवलेल्या पिकामध्ये गेल्या चार-पाच दिवसापासून जिकडे पान २ वर

### नुकसानीचे तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश - तहसीलदार घोळवे

**गेल्या चार-पाच दिवसात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे प्रमाणात नुकसान झाले आहे. सिंदफना नदीसह उपनद्यां लगतच्या गाव शिवारामध्ये प्राधान्याने भेटीगाठी देणे चालू आहे. येत्या चार-पाच दिवसात मंडळ अधिकारी, तलाठी, कृषी सहाय्यक , ग्रामसेवक यांच्या माध्यमातून नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे पूर्ण करण्यात येतील व याची वस्तुनिष्ठता वरिष्ठ पातळीवर पाठवली जाईल. यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या नुकसानीची माहिती वरील पथकातील लोकांना कळून पंचनामे करून घ्यावेत तसे प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांना नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याची आदेश देण्यात आल्याची माहिती तहसीलदार सुरेश घोळवे यांनी दिली आहे.**

## आष्टीच्या तहसीलदाराला पोलादी पुरुषाचा विसर

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्रामध्ये मराठवाड्यात इंग्रज नव्हे तर निजामशाही होती या निजामशाहीने मराठवाड्यातील गोरगरीब जनता अक्षरशः पिळून निघली होती यावेळी या गोष्टीचे गांभीर्य घेत देशाचे त्यावेळचे तात्कालीन संरक्षण मंत्री सरदार वल्लभ भाई पटेल यांनी मराठवाड्यामध्ये सैन्यदल प्राचारण करून अवघ्या सहा तासात मराठवाड्यातील निजामांचा खात्मा केला अशा पोलादी युगपुरुष म्हणून उल्लेख होणाऱ्या सरदार वल्लभभाई पटेल यांची मोठी छाती आहे त्यावेळी देशाचे प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या आदेशाची वाट न पाहता



मराठवाड्यातील परिस्थिती पाहता सरदार वल्लभाई पटेल यांनी मराठवाड्यात सैन्यदल पाठवून निजामशाहीचा खात्मा केला अशा युगपुरुषाचा मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी तहसील कार्यालयातील तहसीलदाराला अक्षरशा विसर पडला १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन आष्टी तहसील कार्यालयामध्ये आमदार सुरेश आण्णा धस माजी आमदार भीमरावजी धोंडे माजी आमदार साहेबराव दरेकर तसेच एकनाथ शिंदे गटाचे आष्टी तालुका शिवसेनाप्रमुख जालिंदर वांढरे यांच्या उपस्थितीमध्ये व तहसीलदार यांच्या उपस्थितीत जो प्रतिमा पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist. Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske (mokashe) Executive Editor Subhash Vilasrao Choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
गुरुवार, दि.१८ सप्टेंबर २०२५ । पान ७

# वाकडमधील हॉटेलमध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागातर्फे मॉक ड्रिल

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रहाटणी उपअग्निशमन केंद्रामार्फत वाकड परिसरातील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये मंगळवारी (दि. १६) मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आपत्कालीन परिस्थिती व अग्निदुर्घटनेच्या प्रसंगी नागरिकांची व हॉटेलमधील कर्मचाऱ्यांची सुरक्षित सुटका कशी करावी याबाबत मार्गदर्शनासह प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

सदर मॉक ड्रिल सहाय्यक आयुक्त (अग्नि) उमेश ढाकणे आणि उपअग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे यांच्या आदेशानुसार, प्रभारी उपअग्निशमन अधिकारी विजय घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मॉक ड्रिल मध्ये अग्निशमन विभागातील अधिकारी, स्थायी कर्मचारी, शिकाऊ जवान,सहभागी झाले हिते. तसेच यावेळी हॉटेल व्यवस्थापन प्रतिनिधी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या मॉक ड्रिलमध्ये आग लागल्यास धुरामुळे होणारा गुदमरण्याचा धोका, लिफ्टचा वापर टाळणे, जिन्यांचा वापर



करून बाहेर पडणे, हॉटेल व्यवस्थापनाने अग्निशमन यंत्रणा तत्काळ कार्यान्वित करणे, तसेच अग्निशमन विभागाशी त्वरेने संपर्क साधणे या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर माहिती देण्यात आली. अग्निशमन दलाच्या जवानांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून अग्निशामक सिलिंडरचा वापर कसा करावा, धुरातून सुरक्षितपणे बाहेर कसे पडावे, तसेच बचाव कार्य करताना कोणती काळजी घ्यावी हे प्रात्यक्षिकातून दाखवून दिले.

अग्निदुर्घटनेची वेळ सांगून येत नाही. अशा वेळी योग्य निर्णय आणि तत्पर कृती जीवन वाचवू शकते. म्हणूनच मॉक ड्रिलद्वारे नागरिकांना व संस्थांना प्रत्यक्ष सराव करून सज्ज करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. पिंपरी चिंचवडसारख्या वेगाने विकसित होणाऱ्या शहरात उंच इमारती, व्यावसायिक प्रकल्प आणि गर्दीच्या ठिकाणी सुरक्षेची जाणीव असणे अत्यंत गरजेचे आहे. आमच्या विभागाकडून अशा प्रकारच्या सरावाचे आयोजन सातत्याने करण्यात येईल. यामुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची जाणीव वाढेल आणि आपत्तीला सामोरे जाताना घाबरून न जाता योग्य कृती करण्याची सवय लागेल.


उमेश ढाकणे, सहाय्यक आयुक्त (अग्नि), पिंपरी चिंचवड महानगरपालिका

हॉटेलमध्ये हजारो नागरिक व कर्मचारी दररोज ये-जा करतात. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापनाची योग्य तयारी व आपत्कालीन परिस्थितीत तातडीची सुटका करणे अतिशय महत्त्वाचे आहे. या मॉक ड्रिलमुळे हॉटेल कर्मचार्यांचा आत्मविश्वास दृढ झाला आहे. आमचे उद्दिष्ट फक्त प्रात्यक्षिक दाखवणे नाही, तर प्रत्यक्ष परिस्थितीत कर्मचारी घाबरून न जाता त्वरित निर्णय घेऊ शकतील याची खात्री करणे आहे. हॉटेल व्यवस्थापनाने देखील सतत प्रशिक्षण व उपकरणांची तपासणी करणे आवश्यक आहे. अशा सरावांमुळे प्रशासन, हॉटेल व्यवस्थापन व नागरिक यांच्यात समन्वय अधिक मजबूत होतो.

– विजय घुगे, प्रभारी उपअग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग

# आयुषच्या खुनासाठी पिस्तूल कुणी दिलं? मारेकऱ्यांनी पोलिसांसमोर दिली कबुली

**पुणे । प्रतिनिधी**



माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांचा मुलगा गणेश कोमकर याचा मुलगा आयुष कोमकर याचा गोळीबार करून खून करण्यात आला होता. या खूनप्रकरणी आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू उर्फ सूर्यकांत राणोजी आंदेकर (७०, रा. नाना पेठ) याच्यासह १३ जणांविरोधात खून व मकोका अंतर्गत गुन्हा दाखल आहे. या खटल्यातील आरोपी आणि बंडू आंदेकरचा मुलगा कृष्णा उर्फ कृष्णराज आंदेकर (३६) स्वतःच्या भाच्याच्या खुनानंतर फरार झाला होता. काही दिवसांपूर्वी बंडू आंदेकर याने 'कृष्णाचा शोध दे, नाहीतर त्याचा एन्काउंटर होईल,' असा दावा केला होता. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी कृष्णा आंदेकर स्वतःहून समर्थ पोलिस ठाण्यात हजर झाला. नाना पेठ परिसरातील आयुष कोमकर खूनप्रकरणात महत्त्वाचा दुवा मानल्या जाणाऱ्या कृष्णा आंदेकरनेच मारेकऱ्यांना पिस्तूल पुरविल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. हे शस्त्र त्याला नेमके कोठून मिळाले, फरारी असताना तो कोणाच्या संपर्कात होता आणि या काळात गुन्ह्याचे पुरावे नष्ट केले का, याचा तपास करणे आवश्यक असल्याचे मत पुणे पोलिसांनी मंगळवारी न्यायालयात मांडले. तपास अधिकाऱ्यांनी कृष्णा हा मारेकरी आणि कट रचणारे आरोपी यांच्यातील मुख्य 'लिंक' असल्याचा दावा केला आहे.गुन्हे शाखेने त्याला अटक करून विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयात हजर केले. सहायक आयुक्त शंकर खटके व विशेष सरकारी वकील विलास पठारे यांनी न्यायालयात सांगितले की, हा खून मालमत्ता आणि पैशांच्या वादातून झाला आहे. गुन्ह्यात वापरलेले पिस्तूल कृष्णानेच दिले असल्याची कबुली इतर आरोपी अमन पठाण व सुजल मेरगू यांनी दिली आहे. त्यामुळे पिस्तूल कुठून आणले, फरारी असताना तो कोणाच्या संपर्कात होता, तसेच त्याची स्थावर-जंगम मालमत्ता तपासणे आवश्यक आहे.दरम्यान, आरोपीच्या वतीने ॲड. मनोज माने, ॲड. मिथुन चव्हाण आणि ॲड. प्रशांत पवार यांनी बचाव मांडताना, गुन्ह्यातील पिस्तूल आधीच जप्त झाले आहे. आरोपी स्वतःहून हजर झाला असून तपासास सहकार्य करत आहे. त्यामुळे पोलिस कोठडीची आवश्यकता नाही, असा युक्तिवाद केला. सरकार व बचाव पक्षाचे म्हणणे ऐकल्यानंतर न्यायालयाने कृष्णा आंदेकरला १८ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. त्यामुळे या खटल्यातील सर्व आरोपी पोलिस कोठडीत असून तपास अधिकाऱ्यांना वैयक्तिक तसेच सामूहिक चौकशीची संधी मिळणार आहे.पोलिसांनी कृष्णा आंदेकरकडे त्याचा मोबाइल मागितला असता, त्याने तो फोडून फेकून दिला असल्याचे सांगितले; तसेच 'मकोका' कायद्यानुसार कारवाईची नोटीसही घ्यायला नकार दिल्याची कबुली आरोपीने न्यायालयात दिली.

# पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सफाई कर्मचाऱ्याला स्कार्पियोच्या धडकेत जागीच मृत्यू

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**



महानगरपालिकेमध्ये घंटा गाडीवर कार्यरत असणारे सफाई कामगार मुकेश कोंडीराम रणपिसे रा. आकाश किरण अपार्टमेंट, पिंपळे गुरव पुणे, वय ४९ वर्षे हे (ता. १७) रोजी सकाळी अंदाजे ९.३० वा. वाकड येथील सिल्वर जिम रोड येथे साफ सफाईचे काम करत असताना स्कार्पियो या चार चाकी गाडीने त्यांना उडवल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यावेळी त्यांच्यासोबत असणारे त्यांचे सहकारी मनोहर शितकल त्यांच्यासोबत काम करत होते. शितकल आणि स्कॉर्पिओ चालक यांनी रणपिसे यांना अपघात झालेल्या गाडीतूनच त्यांना उपचारासाठी दवाखान्यात दाखल केले. मात्र त्याचा काहीही उपयोग झाला नाही.

सदरील स्कॉर्पिओ चालक आणि स्कॉर्पिओ चार चाकी गाडी वाकड पोलिसांनी ताब्यात घेतली असून स्कार्पिओ चालक याच्यावर गुन्हा नोंद करायची प्रक्रिया सुरू आहे. अशी माहिती वाकड पोलिसांकडून जनसंपर्क न्यूजच्या प्रतिनिधीला दिली. यावेळी मोठ्या प्रमाणात वाकड पोलीस स्टेशनच्या येथे सफाई कामगार, अधिकारी हे जमले होते.

मुकेश रणपिसे हे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये १९९७ पासून कामावर रुजू झाले होते. त्यांनी पालिकेमध्ये २८ वर्षे नोकरी केली होती. ते अविवाहित ते पिंपळे गुरव येथे ते भावाकडे राहायला होते. काही महिन्यापूर्वी ते पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये परमनंट झाले होते.

सफाई कामगारांचा कर्तव्य बजावत असताना अपघाती मृत्यू होणे दुर्दैवी – उप आयुक्त – सचिन पवार पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये घंटा गाडीवर कार्यरत असणारे सफाई कामगार मुकेश कोंडीराम रणपिसे हे अत्यंत प्रमाणिक आणि कष्टाळू होते. कर्तव्य बजावत असताना त्यांचा मृत्यू होणे दुर्दैवी बाब आहे. त्यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये २८ वर्षे सेवा दिली आहे. ते परमनंट झाले होते.

# 'आर्टी'च्यावतीने शनिवारी पुण्यात अभियंता उद्योजक कार्यशाळा




**पुणे । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था अर्थात आर्टीच्या वतीने मातंग समाजातील अभियंता उद्योजकासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती आर्टीचे व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे यांनी दिली.

शनिवारी २० सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सीओईपी अभियांत्रिकी विद्यापीठ, पुणे येथे ही कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेत उद्योग क्षेत्रातील यशस्वी व तज्ञ उद्योजक, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागातील प्रशासकीय अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेच्या माध्यमातून उद्योजकांना नवीन संधी आणि मार्गदर्शनही मिळणार आहे. त्याकरिता मातंग समाजातील उद्योजक, अभियंते आणि होतकरू तरुणांनी या कार्यशाळेत आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन यावेळी श्री. सुनील वारे यांनी केले आहे.

# फ्रेंच कंपनी चालविणार शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो

**पुणे । प्रतिनिधी**

हिंजवडी ते शिवाजीनगरच्या तिसऱ्या मार्गिकेचे व्यवस्थापन पुढील दहा वर्षांसाठी किओलीस या खासगी फ्रेंच कंपनीकडे असणार आहे. या मार्गिकेचे काम पीएमआरडीएकडून करण्यात येत आहे. काही दिवसांपूर्वी पुणे आयटी सिटी मेट्रो रेल मर्यादित (पीआयटीसीएमआरएल) कडून याबद्दलच्या करारावर स्वाक्षरी करण्यात आली आहे.



या सार्वजनिक खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर बांधण्यात आलेल्या या मार्गिकेवर नुकत्याच काही चाचण्याही पूर्ण करण्यात आल्या असून, ८७ टक्के पूर्ण झालेली ही मेट्रो सेवा मार्च २०२६ पासून सुरू करण्याचे नियोजन आहे. ८३१३ कोटी रुपये खर्च करून बांधलेल्या या २३ किलोमीटर लांब मार्गिकेवर २३ स्थानके आहेत. त्यापैकी १,३१५ कोटी रुपये खासगी कंपन्यांनी उभे केले आहेत. तर ४७८९ कोटी रुपये वित्तीय संस्थांकडून कर्ज स्वरूपात उभे करण्यात आले आहे. तर महाराष्ट्र सरकारकडून ९०.५८ कोटी रुपये आणि केंद्र सरकारकडून १२२४.८० कोटी रुपये व्यवहार्यता तफावत निधी म्हणून दिले जाणार आहेत. या नवीन मार्गिकेमुळे पुण्याचा मध्यवर्ती भाग आणि जिल्हा व्यवस्थापनाचे केंद्र असलेले शिवाजीनगर येथील १,५०,००० हून अधिक लोकांना रोजगार देणाऱ्या हिंजवडी येथील आयटी हबमधील प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल.

त्यात पीआयटीसीएमआरएलने काही दिवसांपूर्वी किओलीस या कंपनीबरोबर मेट्रोसाठी करार केला आहे. त्यानंतर किओलीस अल्स्टॉम कंपनीने पुरवलेल्या २२ गाड्या, २३ स्थानके आणि तिकीट प्रणालीची देखभाल पुढील दहा वर्षांसाठी करेल तर या मार्गिकेवरचे सर्व पायलट महिला असणार असून, देशात पहिल्यांदाच असा उपक्रम चालवला जात असल्याचे किओलीसने म्हटले आहे. हा समूह सध्या ६ देशांमध्ये ४५२ किलोमीटर लांबीचे ९ मेट्रो मार्गाचे व्यवस्थापन करते.

# शरद पवार यांनी कोणत्या समाजाचे भले करण्याची भूमिका कधीही घेतली नाही–चंद्रशेखर बावनकुळे

**पुणे । प्रतिनिधी**



शरद पवार यांनी कधीच कोणत्या समाजाचे भले करण्याची भूमिका घेतली नाही. मराठा समाजाला त्यांनी कधीच आरक्षणाकडे नेले नाही. ओबीसी समाजाला कधी प्रगतीकडे नेले नाही, त्या शरद पवारांना जातीच्या उपसमित्या स्थापन करण्यावर वक्तव्य करण्याचा अधिकार नाही, अशी टीका महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावर बुधवारी (दि.१७) केली.

उलट जेव्हा विशिष्ट समाजाला न्याय द्यायची गोष्ट येते, तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे प्रत्येक समाजाच्या मागे उभे राहतात, त्यांचे प्रश्न सोडवतात. मराठा आणि ओबीसी समाजासाठी त्यांनी अनेक योजना आणल्या आहेत, अशा शब्दांत बावनकुळे यांनी देवेंद्र फडणवीस यांची बाजूही मांडली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित एका कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी बावनकुळे बोलत होते. 'दृष्कृत करणार्या समाजात माफी नसेल, दृष्कृत करणार्या समाजकंटकांना आणि व्यक्तींना आमचे सरकार सोडणार नाही,' असेही त्यांनी सांगितले.

ओबीसी समाजाविषयी असलेली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका स्पष्ट करताना बावनकुळे म्हणाले, आमचे सरकार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मी सुद्धा स्पष्ट करतो की, 'आम्ही ओबीसी समाजावर आणि अठरा पगड जातीवर कोणताही अन्याय होऊ देणार नाही. फडणवीस हे ओबीसी समाज, मराठा समाज आणि सर्व समाजाकरिता न्याय भूमिकेत आहेत, मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रात ओबीसी मंत्रालय पहिल्यांदा सुरू केले. अनेक योजना आणल्या. महाविकास आघाडीच्या सरकारच्या काळात गेलेले ओबीसी समाजाचे आरक्षण पुन्हा परत आणण्याचे काम त्यांनी केले. मराठा समाजालाही आरक्षण देण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यामुळे जो नेता, जो मुख्यमंत्री ओबीसी समाजाकरिता कार्य करत आहे, त्यांची गाडी अडविणे, त्यांच्या विरोधात घोषणा देणे ही चांगली गोष्ट नाही.महसूल विभागाकडून दिले जाणारे प्रमाणपत्र सुरक्षितपणे दिले जाईल, याकडे लक्ष देणार आहोत. कोणीही चुकीच्या पद्धतीने प्रमाणपत्र घेण्याचा प्रयत्न करेल, त्यांची संपूर्ण चौकशी आम्ही करू. खोटे प्रमाणपत्र कुठलेही प्रांत आणि तहसीलदार देणार नाहीत. याची खबरदारी सरकारने घेतली आहे, असेही चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

# महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशनकडून गौरव

**राजगुरुनगर । प्रतिनिधी**



पुणे जिल्ह्यात अग्रणी असलेल्या राजगुरुनगर सहकारी बँकेस 'महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशन'चा सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार मिळाला आहे.


महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेल्या राजगुरुनगर सहकारी बँकेस, 'महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशन'चा सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठीचा सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार, द्वितीय क्रमांकासाठी मिळाला. हा पुरस्कार बँकेस, नॅशनल अर्बन को-ऑपरेटिव्ह फायनान्स अँड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे अध्यक्ष ज्योतिंद्र मेहता व आमदार प्रवीण दरेकर यांच्या हस्ते शनिवारी प्रदान करण्यात आला.

फेडरेशन राज्यभरातील उत्कृष्ट कामकाज असलेल्या बँकांमधून दरवर्षी पुरस्कारार्थी बँका निवडते. राजगुरुनगर बँकेला १००० ते २५०० कोटींच्या दरम्यान ठेवी असलेल्या गटातून सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील कामगिरीसाठी हा पुरस्कार मिळाला. या आर्थिक वर्षात दिनेश ओसवाल यांनी अध्यक्ष म्हणून व अविनाश कहाणे यांनी उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले होते. सन २०२३- २०२४ या आर्थिक वर्षातील कामगिरीसाठीही बँकेला हा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला होता. तेव्हाही ओसवाल व कहाणे हेच अध्यक्ष व उपाध्यक्ष होते.

सर्वोत्कृष्ट बँक पुरस्काराचे वितरण १३ सप्टेंबर रोजी नाशिक येथे स्वामीनारायण कन्व्हेंशन सेंटरच्या सभागृहात झालेल्या बँक फेडरेशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत करण्यात आले. यावेळी फेडरेशनचे अध्यक्ष अजय ब्रह्मेचा, उपाध्यक्षा वैशाली आवाडे, राजगुरुनगर बँकेचे अध्यक्ष सागर पाटोळे, संचालक राजेंद्र सांडभोर, विजया शिंदे, दिनेश ओसवाल, विनायक घुमटकर, अविनाश कहाणे, रामदास धनवटे, विजय डोळस, व्यवस्थापन मंडळ सदस्य दीपक वारुळे, महेश शेवकरी, सरव्यवस्थापक अमृत टाकळकर, उपसरव्यवस्थापक संजय ससाणे, सहायक सरव्यवस्थापक शंकर कोल्हे उपस्थित होते.

# उद्योगाच्या बहाण्याने ९० महिलांची फसवणूक; बारामतीतील दाम्पत्याविरुद्ध गुन्हा

**पुणे । प्रतिनिधी**




गृहोद्योगासाठी कच्चा माल पुरविण्याच्या आमिषाने ९० महिलांची दोन लाख ७० हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी बारामतीतील एका दाम्पत्याविरुद्ध स्वारगेट पोलिसांनी गुन्हा दाखल केला. सुनील नारायण शिराळकर, सविता सुनील शिराळकर (दोघे रा. एकदंत अपार्टमेंट, बारामती, जि. पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत रागिणी सुधीर धोंगडे (वय ४३, रा. आळे, ता. जुन्नर, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिराळकर दाम्पत्याने 'महिला उद्योगवर्धिनी' या संस्थेच्या वतीने टिळक रस्त्यावरील मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभागृहात बैठक घेतली होती. गृहिणींना उद्योगासाठी मदत तसेच कच्च्या मालाचा पुरवठा करण्यात येईल, असे त्यांनी बैठकीदरम्यान सांगितले होते. राखी, जपमाळ तयार करण्यासाठी कच्चा माल पुरविण्याचे सांगून शिराळकर दाम्पत्याने महिलांकडून दोन लाख ७० हजार रुपये घेतले. पैसे घेतल्यानंतर शिराळकर दाम्पत्याने त्यांना गृहोद्योग सुरू करण्यासाठी कच्चा माल पुरविला नाही, असे धोंगडे यांनी फिर्यादीत म्हटले आहे.

दरम्यान, फसवणूक झाल्याचे लक्षात येताच धोंगडे यांनी पोलिसांत तक्रार दिली होती. त्यानुसार फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिराळकर दाम्पत्याने ऐंशी ते नव्वद महिलांकडून पैसे घेतल्याचे आत्तापर्यंतच्या तपासात समोर आल्याचे पोलिस उपनिरीक्षक शिरसाट यांनी सांगितले.

# पुण्यात इलेक्ट्रिक डबल डेकर धावली

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात मंगलवारी कात्रज-हिंजवडी मार्गावर पहिल्यांदाच इलेक्ट्रिक डबल डेकर बस धावली. सध्या प्रायोगिक तत्वावर बसची चाचणी सुरू असून, पुढील आठ ते दहा दिवसात आणखीन तीन मार्गावर बसची चाचणी होईल. ती यशस्वी झाल्यावर डबल डेकर बस खरेदीचा प्रस्ताव संचालक मंडळाकडून मंजूर होईल. त्यानंतर डबल डेकर बसचा मार्ग मोकळा होईल. पहिल्या टप्प्यात १० डबल डेकर बस घेण्याचा विचार आहे.




पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपीएमएल) चाचणी घेतलेली बस स्वीच कंपनीची असून ती इलेक्ट्रिक, वातानाकुलीत आणि अत्याधुनिक सुविधा असलेली आहे. शहर प्रदूषणमुक्त वाहतुकीकडे महत्त्वाचे पाऊल म्हणजे इलेक्ट्रिक डबल डेकर.

चाचणीवेळी पीएमपीएमएल अध्यक्ष पंकज देवरे, व्यवस्थापक सतीश गव्हाणे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.वाढत्या लोकसंख्येमुळे वाहतुक कोंडी दिवसेंदिवस वाढत आहे. नागरिकांना सार्वजनिक वाहतुकीकडे वळविणे ही मोठी गरज आहे. डबल डेकर बस एका फेरीत ८० हून अधिक प्रवासी प्रवास करतात.

चार मार्गांवर चाचणी

– हिंजवडी फेज ३ ते हिंजवडी फेज ३ (वर्तुळ मार्ग)

– रामवाडी मेट्रो स्टेशन ते खराडी – मगरपट्टा सीटी ते कल्याणीनगर मेट्रो स्टेशन – पुणे स्टेशन ते लोहगाव विमानतळ मार्गे विमाननगर

# रस्त्याची पाहणी करायला गेलेल्या सरपंचावर सोडले कुत्रे, पाळीव कुत्र्याच्या हल्ल्यात रक्तबंबाळ

**वेल्हे । प्रतिनिधी**



पानशेत धरणतीरावरील कादवे येथे ग्रामपंचायतीच्या विहिरीकडे जाणार्या रस्त्याची सरकारी अधिकार्यांसह पाहणी केल्याच्या कारणावरून भावासह कादवेचे (ता. राजगड) सरपंच अनंता गणपत बिरामणे (वय ४५) यांच्यावर पाळीव कुत्र्यासह काठ्या व दगडांनी हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात सरपंच अनंता व त्यांचा भाऊ विनोद गणपत बिरामणे (वय ४०) हे जखमी झाले आहेत. सरपंच अनंता बिरामणे यांच्या उजव्या पायाचे लचके पाळीव कुत्र्याने तोडल्याने ते रक्तबंबाळ झाले आहेत.

ही घटना सोमवारी (दि. १५) दुपारी साडेबाराच्या सुमारास पानशेत-कादवे रस्त्यावर घडली. याप्रकरणी वेल्हे पोलिसांनी अर्जुन बापू शिर्के (वय २१) व करण बापू शिर्के (वय २३, दोघे रा. शिर्केवाडी, कादवे) यांना अटक केली. सरपंच अनंता बिरामणे यांच्या अंगावर पाळीव कुत्रे सोडून काठीने मारहाण करणार्या शकुंतला मारुती शिर्के यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वेल्हे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कादवे-शिर्केवाडी येथील ग्रामपंचायतीच्या विहिरीकडे जाणार्या रस्त्याची काही लोकांनी जाणून बुजून अडवणूक केली आहे. कादवे ग्रामपंचायतीच्या वतीने विहिरीकडे जाण्यासाठी रस्ता मिळावा, यासाठी राजगड तालुका तहसील व प्रांताधिकारी व इतर सरकारी कार्यालयांमध्ये अर्ज केले आहेत.

त्यानुषंगाने सोमवारी सरकारी अधिकारी अडवणूक केलेल्या रस्त्याची स्थळपाहणी करण्यासाठी आले होते. अधिकारी निघून गेल्यानंतर चिडून जाऊन अर्जुन बापू शिर्के, करण बापू शिर्के व शकुंतला मारुती शिर्के यांनी संगनमताने सरपंच अनंता बिरामणे व कादवेचे पोलिस पाटील भाऊसाहेब भागुजी ढेबे यांना शिवीगाळ आणि दमदाटी केली. करण शिर्के व अर्जुन शिर्के याने सरपंच अनंता बिरामणे व त्याचा भाऊ विनोद बिरामणे यांना दगड, लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या वेळी शकुंतला शिर्के यांनी त्यांच्या घरातील पाळीव कुत्रे सरपंच अनंता बिरामणे यांच्या अंगावर सोडले.